७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. २१ जुलै २०२६

www.dainikesandhya.com  www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : २०६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

## संतपरंपरेचा वारसा जपत तीर्थक्षेत्रांचा विकास करावा

मुंबई (दै. संध्या)

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : गंगाखेड, अमरावती व काटोलच्या सुधारित तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांना मंजुरी
- ११५ कोटींच्या विकासकामांना मिळणार गती
- आराखड्यातील कामे दर्जेदार व निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश



संतपरंपरेचे जतन करत आध्यात्मिक वारसा जपत धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी तीर्थक्षेत्रांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथील श्री संत जनाबाई तीर्थक्षेत्रासाठी ४८.५५ कोटी, अमरावती येथील श्री संत गाडगेबाबा समाधीस्थळासाठी २५ कोटी आणि नागपूर जिल्ह्यातील काटोल येथील श्री चक्रधर स्वामी मंदिर परिसरसाठी ४१.७५ कोटी या तीन तीर्थक्षेत्रांच्या सुधारित विकास आराखड्यांना एकूण ११५ कोटींच्या विकासकामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. आराखड्यातील सर्व कामे उत्सव काळातील भाविकांची संख्या लक्षात घेवून दर्जेदार पद्धतीने व टप्प्याटप्प्याने निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सहयाद्री अतिथी गृह येथे विविध तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समिती बैठकीमध्ये मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, राज्यमंत्री मेघना साकोरे- बोर्डीकर, आमदार रत्नाकर गुट्टे, आमदार चरण सिंग ठाकूर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भाविकांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देतानाच तीर्थक्षेत्रात नव्याने करण्यात येणाऱ्या कामांमुळे स्थानिक अर्थव्यवस्था, रोजगार आणि पर्यटनालाही मोठी चालना मिळेल.

परभणी येथील श्री संत जनाबाई तीर्थक्षेत्रासाठी ४८.५५ रूपये कोटी विकास आराखड्यामध्ये श्री संत जनाबाई जन्मस्थळ परिसरात सांस्कृतिक सभागृह, गोदावरी घाट विकास, दर्शन मंडप, उद्यान व सुशोभीकरण, पाथवे, मंदिर ते घाट सिमेंट कॉंक्रीट रस्ता, गोरक्षण इमारत, संरक्षक भिंती, जलनिस्सारण व्यवस्था, विद्युत सुविधा, सार्वजनिक स्वच्छतागृहे, सौरऊर्जा, सीसीटीव्ही, पिण्याचे पाणी, लँडस्केपिंग आदी कामांचा समावेश करण्यात आला आहे. या आराखड्यामुळे वारकरी, भाविक आणि पर्यटकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार असून गंगाखेड हे संत जनाबाईंच्या आध्यात्मिक वारशाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होणार आहे

अमरावती येथील श्री संत गाडगेबाबा समाधीस्थळ विकासासाठी २५ कोटी रूपयांच्या कामांमध्ये श्री संत गाडगे महाराज स्मृती केंद्र कल्चरल व्हॅल्यू एज्युकेशन सेंटरचे उर्वरित बांधकाम, श्री संत गाडगे महाराज स्मृति भवन परिसरामध्ये शेतकरी ग्राम सफाई मिशन सेंटर तळमजल्याचे बांधकाम करणे, यात्री निवासाच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याचे बांधकाम, कीर्तनासाठी सभागृह, समाधीचा जीर्णोद्धार व सौंदर्यीकरण, ध्यान केंद्रासाठी इमारत, कुंताबाई समाधीचे सौंदर्यीकरण, अंतर्गत रस्ते,पार्किंग, बगीचे,फर्निचर व इतर पायाभूत सुविधांचा समावेश आहे.

चक्रधर स्वामी मंदिर परिसरासाठी ४१.७५ कोटींच्या कामांमध्ये काटोल येथील भगवान श्री चक्रधर स्वामी मंदिर परिसर विकास आराखड्यात बहुउद्देशीय सभागृह, आधुनिक सार्वजनिक प्रसाधनगृह, भव्य प्रवेशद्वार, संरक्षक भिंत, वाहनतळ, बगीचा, कमानी पूल, पाथवे आणि इतर पर्यटन सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. या विकासामुळे महानुभाव पंथाच्या या ऐतिहासिक तीर्थक्षेत्रात भाविकांसाठी सुरक्षित, सुसज्ज आणि आधुनिक सुविधा निर्माण होणार असून धार्मिक पर्यटनालाही मोठी चालना मिळणार आहे.

बैठकीला वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, प्रधान सचिव डॉ के. एच. गोविंदराज, पोलीस महासंचालक सदानंद दाते, नागपूर, परभणी व अमरावती विभागाचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## कॉक्रोच जनता पार्टीच्या शिष्टमंडळासोबत चर्चा; आंदोलन थांबवावं : जे पी नड्डा

मुंबई (दै. संध्या)



नीट पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत गेल्या 30 दिवसांपासून दिल्लीच्या जंतरमंतर मैदानावर सुरु असलेल्या आंदोलनाने आता आक्रमक स्वरुप धारण केले आहे. आज कॉक्रोच जनता पार्टीकडून संसदेवर मोर्चा काढण्याची हाक दिली होती. मात्र, पोलिसांनी काल रात्रीपासून जंतरमंतरवर बॅरिकेडिंग करत अभिजीत दिपके यांच्यासह सर्व आंदोलकांना त्याच ठिकाणी अडकवून ठेवले. मात्र, कॉकरोच जनता पार्टीच्या समर्थकांचा एक वेगळा जमाव संसद भवनाच्या परिसरात पोहोचल्याने पोलीस यंत्रणेची मोठी धावपळ उडाली आहे. यावर केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आंदोलकांनी हे आंदोलन थांबवावं असं आवाहन नड्डा यांनी केलं आहे. नीट पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणीसाठी सुरु असलेलं आंदोलन आंदोलकांनी थांबवावं असं आवाहन जे पी नड्डा यांनी केलं आहे. कॉक्रोच जनता पार्टीच्या शिष्टमंडळासोबत चर्चा झाली आहे. त्यांनी त्यांच्या मागण्या सरकारकडे दिल्या असल्याची माहिती जे पी नड्डा यांनी दिली आहे. शांततापूर्ण चर्चा झाल्याची माहिती त्यांनी दिली आहे. आंदोलन मागे घ्यावं, जनजिवन पुर्वरत करण्यासाठी पोलीसांना मदत करावी असे जे पी नड्डा म्हणाले. आंदोलकांकडून सरकारकडे चर्चेचा आज पहिला प्रस्ताव आला आहे. सकाळी 11.50 पासून आमची आंदोलाकांसोबत चर्चा सुरू आहे असे नड्डा म्हणाले. आंदोलकांसोबत बैठक पार पडली आहे. शिष्टमंडळासोबत व्यवस्थीत चर्चा झाली आहे असे नड्डा म्हणाले. आंदोलकांकडुन दुपारी 4 वाजता निवेदन देण्यात आले आहे असे नड्डा म्हणाले.

## पतीच्या छळाला कंटाळून महिलेने १० महिन्यांच्या लेकीला संपवलं

सोलापूर (दै. संध्या)

सोलापूर जिल्ह्यातील बार्शीत धक्कादायक घटना घडली आहे. माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. पतीच्या छळाला कंटाळलेल्या एका महिलेने आपल्या अवघ्या 10 महिन्यांच्या मुलीचा गळा दाबून तिला पाण्याच्या बादलीत बुडवून ठार मारल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यानंतर या आईने सहा वर्षांच्या मोठ्या मुलीलाही ठार मारण्याचा प्रयत्न केला. मात्र, आई, मी शाळा शिकते, मला मारु नकोस, अशी आर्त विनवणी मुलीने करताच तिचा जीव बचावला आहे. दरम्यान, धक्कादायक बाब म्हणजे हत्या केल्यानंतर आरोपी महिला मृत चिमुकलीला खांद्यावर घेऊन थेट बार्शी शहर पोलीस ठाण्यात पोहोचली. माझ्या पतीच्या त्रासाला कंटाळून मी माझ्या मुलीची हत्या केली आहे. मला अटक करा, अशी कबुली पोलिसांसमोर तिने दिली आहे. आरोपी महिलेचे नाव पूजा योगेश खुर्दामळे (वय 26) असून मृत चिमुकलीचे नाव शक्ती (वय 10 महिने) आहे. तर मोठी मुलगी तेजल (वय 6 वर्षे) सुदैवाने बचावली.




- मृतदेह घेऊन पोहोचली थेट पोलिस स्थानकात, सोलापूरच्या बार्शीत धक्कादायक घटना

मोठी मुलगी तेजल हिच्याकडे पोलिसांनी चौकशी केली असता धक्कादायक माहिती समोर आली. वडील कामावर गेल्यानंतर आईने आधी लहान बहिणीचा गळा दाबून तिला पाण्याच्या बादलीत बुडवले. त्यानंतर माझाही गळा दाबण्याचा आणि तोंडावर उशी दाबण्याचा प्रयत्न केला. मात्र, आई, मी शाळा शिकते, मला मारु नकोस," असे म्हणाल्यानंतर आईने मला सोडून दिले, अशी माहिती तेजलने पोलिसांना दिली. या प्रकरणी बार्शी शहर पोलिसांनी पूजा खुर्दामळे हिच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 103 (1) आणि 109 अन्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

## अमित शाहांची धर्मेंद्र प्रधान यांच्यासोबत बैठक

मुंबई (दै. संध्या)

नीट यूजी परीक्षेच्या पेपरफुटीमुळं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी सातत्याने केली जात आहे. सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी रुग्णालयात दाखल करुन देखील आज मोर्चाला मोठ्या प्रमाणात आंदोलक जमले होते. आंदोलक संसद भवनापर्यंत पोहोचल्यानं संसदेची गेट बंद करण्यात आली होती. काही ठिकाणी दिल्ली पोलीस आणि सुरक्षा दलांकडून लाठीचार्ज आणि अश्रू धुरांच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. नवी दिल्लीतील या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत बैठकांचा धडाका सुरु आहे.

सध्या केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या सोबत धर्मेंद्र प्रधान यांची बैठक आणि चर्चा देखील सुरु असल्याची माहिती समोर आली होती. मात्र, नव्या अपडेट नुसार अमित शाह यांची केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, पीयूष गोयल आणि किरण रिजिजू यांच्यासोबत बैठक सुरु असल्याची माहिती आहे. अमित शाह यांच्यासोबतच्या चर्चेच्या नंतर धर्मेंद्र प्रधान हे राजीनामा देणार का? याची उत्सुकता देखील आहे. सूत्रांच्या माहितीनुसार दिल्लीतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर



**अमित शाहांची तीन मंत्र्यांसोबत बैठक**

केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन आणि दिल्ली पोलीस आयुक्त यांच्यात बैठक झाली आहे. या बैठकीत आंदोलनाच्या स्थितीवर चर्चा करण्यात आली. या बैठकीला गुप्तचर विभागाचे म्हणजेच IB चे प्रमुख उपस्थित असल्याचं सांगण्यात आलं आहे. सीजेपीकडून धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी जंतर मंतर ते संसद भवन असा मोर्चा काढण्यात येणार होता. या मोर्चाला पोलिसांनी रोखलं. या संदर्भात बोलताना कॉंग्रेस खासदार पवन खेरा यांना लोकशाहीत विरोधी आंदोलन संसदेच्या बाहेर नाही तर कुठं जाऊन करावं? आंदोलन तिथंच होईल. तुम्ही तिथं त्यांचा आवाज ऐकू शकता, मात्र तुम्हाला जनतेचा आवाज ऐकायचा नाहीये. तुमच्या दारावर येऊन युवकांना त्यांच्या गोष्टी सांगायच्या आहेत. आमची मागणी मान्य करा धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्या आणि परीक्षेत पारदर्शकता आणा, असं पवन खेरा म्हणाले. राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं की विद्यार्थ्यांवरील लाठीचार्ज हा लोकशाहीवरील हल्ला आहे. हे सरकार सत्तेत बसण्यास पात्र नाही, असंही खरगे यांनी म्हटलं. अभिजित दिपके याच्या

दरम्यान, या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी एक महिला तिच्या मुलासह दादर परिसरात आली होती. मात्र पोलीस आपल्याला या परिसरात थांबू देत नसल्याचा आरोप तिने केला. आम्हाला चैत्यभूमीवर उभं राहू दिलं जात नाही, पोलीस बाजूला काढतात, असं ती माध्यमांना सांगत होती. त्याचवेळी त्या ठिकाणी पोलीस दाखल झाले आणि त्यांनी त्या महिलेला ताब्यात घेतलं. त्याचवेळी त्या महिलेसोबत असलेल्या मुलाने टाहो फोडल्याचं दिसून आलं. हा मुलगा रडताना तिची आई तिला समजावताना दिसली. तसेच आजूबाजूच्या लोकांनीही त्या मुलाला धीर देण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी या आई आणि मुलालाही ताब्यात घेतल्याचं दिसून आलं.

कॉकरोच जनता पार्टीकडून नवी दिल्लीत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली आहे. सोनम वांगचुक यांचं 21 दिवस उपोषण सुरु होतं, अखेर त्यांना दिल्ली पोलिसांनी जबरदस्तीनं रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर सीजेपीच्या आंदोलनाची देशभर चर्चा झाली.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

**ढिंग-टांग**




### ॲड. विजयसिंह ठोंबरेंनी दिली माहिती

## धंगेकरांच्या अटकपूर्व जामीनावरील सुनावणी पुढे ढकलली

पुणे (दै. संध्या)



पुण्यातील बांधकाम व्यावसायिक खलील शेख यांच्या आत्महत्या प्रकरणात आता माजी आमदार आणि शिंदे गटाचे नेते रवींद्र धंगेकर यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. या प्रकरणात गेल्या काही दिवसांपासून रवींद्र धंगेकर आणि त्यांच्या पत्नीवर अटकेची टांगती तलवार आहे. पोलिसांनी खलील शेख आत्महत्याप्रकरणात धंगेकर पती-पत्नीसह दहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला होता. यानंतर पोलिसांनी याप्रकरणात अटकेची शक्यताही बोलून दाखवली होती. रवींद्र धंगेकर आणि प्रतिभा धंगेकर या दोघांनी अटकपूर्वक जामीन अर्ज मिळवण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. धंगेकर दाम्पत्याच्या अटकपूर्व जामीन अर्जावर आज (सोमवारी, ता २०) सुनावणी होणार होती, पण माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्या प्रकरणातील सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. पोलिसांनी त्यांच म्हणणं न मांडल्यामुळे सुनावणी पुढे ढकलली आहे. 22 जुलैला ही सुनावणी पार पडणार आहे.

रवींद्र धंगेकर यांच्या जामीन अर्जावर बुधवारी सुनावणी पार पडणार आहे. आज पोलीस जाणीवपूर्वक कोर्टात आले नाहीत. त्यांना एक दिवस म्हणणं सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. बुधवारी या प्रकरणावरती सुनावणी होईल. पोलिसांनी आज कारण काय हे सुद्धा लेखी सांगितलं नाही, त्यामुळे बुधवारी ही सुनावणी ठेवण्यात आली आहे. सुनावणीबाबत बोलताना ॲड. विजयसिंह ठोंबरे पाटील म्हणाले की, "आजच सुनावणी फिक्स केली होती जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये. आम्ही शनिवारी अर्ज दाखल केल्यानंतर, संडे असल्यामुळे आज सुनावणी फिक्स करण्यात आली होती. परंतु पोलिसांनी जाणीवपूर्वक आज त्यांचं म्हणणं मांडलेलं नाही आणि त्याच्यामुळे कोर्टाने त्यांना परवा दिवशीच्या तारीखेची सुनावणीची वेळ दिलेली आहे. परवा दिवशी त्याच कोर्टासमोर सुनावणी होईल. केवळ पोलिसांनी त्यांचं म्हणणं मांडलेलं नाही म्हणून आज सुनावणी झाली नाही आणि एवढं त्याच्यापुढेसुद्धा आपल्याला सांगतो की, पोलिसांनी साधं त्यांना काय कारणामुळे म्हणणं मांडता येत नाही, याचंसुद्धा लेखी त्यांनी कुठलं कोर्टाला कळवलेलं नाहीये. त्यामुळे एक दिवस त्यांना संधी देण्यात आलेली, परवा दिवशी असं पूर्ण हियरिंग ठेवण्यात आलेलं आहे."

बांधकाम व्यावसायिक खलील शेख यांनी व्हिडिओ तयार करून गळफास घेत आत्महत्या केली होती. यामध्ये त्यांनी रवींद्र धंगेकर, त्यांच्या पत्नी प्रतिभा धंगेकर, मनसेचे माजी नगरसेवक बाळा शेडगे, त्यांच्या पत्नी वर्षा शेडगे यांच्यासह अनेकांना आपल्या मृत्यूसाठी जबाबदार धरले होते. यानंतर स्वारगेट पोलीस ठाण्यात माजी आमदार धंगेकरांसह 14 जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. खलील शेख हा लेबर कॉन्ट्रॅक्टर होता. त्याने ज्या इमारतीमध्ये आत्महत्या केली त्याच्या बाहेरच्या बाजूला चिठ्ठी चिटकवली होती. आणखी एक चिठ्ठी त्यांच्या खिशात होती. पोलिसांनी ही सदरची चिठ्ठी पाहिली आणि त्यानंतर खलील शेखचा मृतदेह ससूनला पाठवण्यात आला. यानंतर काल संध्याकाळी खलील शेख याच्या पत्नीने केलेल्या तक्रारीनुसार 14 जणांविरोधात फिर्याद नोंदवून घेण्यात आल्याची माहिती पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी दिली होती. खलील शेख 2011 पासून पुण्यात बांधकामाची कामे करत होता. तो आरोपींकडे सेंट्रिगचं काम करत होता. खलील शेखने या कामासाठी बाहेरुन व्याजाने पैसे उचलले होते. आम्ही व्याजासहित पैसे दऊ, असे आश्वासन या सगळ्यांनी दिले होते. मात्र, यापैकी कोणीही पैसे न दिल्याने खलील तणावात होता. उत्कर्ष असोसिएट ही जी फर्म आहे, त्याठिकाणी रवींद्र धंगेकर यांची पत्नी, बाळा शेडगे, रघू गौडा यांची पत्नी भागीदार आहेत.

## अहिल्यानगरमध्ये रसाळ टोळीकडून ५ गावठी कट्टे जप्त



अहिल्यानगर (दै. संध्या)

नगर एमआयडीसी व सुपा एमआयडीसी परिसरात धुमाकूळ घालणाऱ्या रसाळ टोळीतील ७ जणांना पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. या टोळीकडून ५ गावठी कट्टे हस्तगत करण्यात आले आहेत. या टोळीकडून दरोडा टाकून अपहरण केल्याचा गुन्हाही उघडकीस आला आहे. या टोळीविरुद्ध नगर व पुणे जिल्ह्यात अनेक गुन्हे दाखल आहेत.

पिंटू उर्फ भाऊ आनंदा रसाळ (वय ४०, रसाळवाडी, निघोज, पारनेर), बंटी उर्फ स्वप्निल बिभीषण पाबळे (वय ३०, कावळ पिंपरी, जुन्नर, पुणे) भाऊसाहेब रामचंद्र लंघे (वय ३१, शिरूर, पुणे), हर्षद मनोज थोरात (वय २९, लोणी धामणी, आंबेगाव, पुणे), जावेद किन्नर काळे (वय २०, राळेगण थेरपाळ, पारनेर), मिनीनाथ पोपटराव वागस्कर (जामखेड रस्ता, निंबोडी, अहिल्यानगर) व जितेश सुरेश सरडे ( देवीभोयरे, पारनेर) या ७ जणांना अटक करण्यात आली आहे. या टोळीतील आणखी पाच जण फरार आहेत. भाऊ रसाळ व बंटी पाबळे या दोघांना नगर एमआयडीसी जवळील शेंडी बाह्यवळण रस्त्यावर अटक करण्यात आली. या दोघांकडून ५ गावठी कट्टे, मोबाईल, स्कोडा गाडी असा एकूण सुमारे ११ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. भाऊ रसाळ याने याच टोळीतील भैय्या उर्फ ऋषिकेश सुभाष भोसले (धाराशिव) याच्याकडून गावठी कट्टे विक्रीसाठी आणले होते.

या टोळीने लुटमार करण्याच्या उद्देशाने सुपा परिसरात राहणारे विशाल संपत पवार व त्यांचे दोन मित्र शिर्डी येथून देवदर्शन करून नगरकडे येत असताना त्यांचे वाहन अडवून मारहाण करून अपहरण केले. यासंदर्भात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही घटना १४ जुलैला घडली. या गुन्ह्याचा तपास करत असताना पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, पोलिस अंमलदार गणेश लोंढे, राहुल द्वारके, रोहित येमुल, प्रशांत राठोड यांच्या पथकाने आरोपींना नगर एमआयडीसी जवळील देहरे परिसरात अटक केली. भाऊ रसाळ याच्याविरुद्ध नगर व पुणे जिल्ह्यात खून, खुनाचा प्रयत्न अशा गंभीर स्वरूपाचे सहा गुन्हे दाखल आहेत.

## संपादकीय

# स्वप्नगरीतील असुरक्षित प्रवास

मुंबईची ओळख ही सुरक्षित, वेगवान आणि कधीही न थांबणाऱ्या शहराची आहे. मात्र बेस्ट बस अपघात आणि लोकलमधील वाढत्या हिंसक घटनांमुळे सुरक्षित प्रवासाचा नागरिकांचा विश्वास डळमळीत झाला असून, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील त्रुटींवर तातडीने उपाययोजना करण्याची वेळ आली आहे.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी, स्वप्नांची नगरी आणि लाखो लोकांच्या रोजच्या जगण्याचा आधार आहे. दररोज कोट्यवधी प्रवासी बेस्ट बस, लोकल, मेट्रो आणि इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करून आपल्या कामावर जातात. एकेकाळी 'मुंबई कधीच थांबत नाही' आणि सुरक्षित शहर ही ओळख अभिमानाने सांगितली जात होती. मात्र अलीकडच्या काळात घडणाऱ्या घटना पाहता हा अभिमान आता भीतीमध्ये बदलू लागला आहे. घरातून सकाळी कामासाठी बाहेर पडणारा माणूस संध्याकाळी सुखरूप घरी परत येईल का, हा प्रश्न प्रत्येक कुटुंबाला सतावू लागला आहे. अलीकडेच मुंबईतील रस्त्यांवर बेस्ट बसचे अनेक गंभीर अपघात घडले. काही ठिकाणी निष्पाप पादचाऱ्यांचा जीव गेला, तर अनेक जण जखमी झाले. बस ही सामान्य नागरिकांची सर्वात विश्वासार्ह वाहतूक सेवा मानली जाते. विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कामगार मोठ्या प्रमाणावर तिच्यावर अवलंबून असतात; परंतु त्याच बस जेव्हा अपघातांचे कारण बनू लागतात, तेव्हा नागरिकांचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. दुसरीकडे मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या लोकल रेल्वेची परिस्थितीही चिंताजनक आहे. दररोज लाखो प्रवासी जीव धोक्यात घालून गर्दीतून प्रवास करतात. यामध्ये आता प्रवाशांमधील किरकोळ वादातून होणारे जीवघेणे हल्ले, धक्काबुक्की, मारहाण आणि चाकू हल्ल्यांच्या घटना वाढत आहेत. क्षुल्लक कारणावरून सुरू झालेला वाद काही क्षणांत हिंसक स्वरूप धारण करतो आणि एखाद्याचा जीव जातो. ही परिस्थिती केवळ कायदा-सुव्यवस्थेची नव्हे, तर समाजाच्या मानसिकतेचाही प्रश्न निर्माण करते. प्रवास हा सुरक्षिततेचा आणि विश्वासाचा विषय असतो. मात्र आज अनेक प्रवासी घराबाहेर पडताना मनात भीती घेऊनच निघतात. रस्ता ओलांडताना वेगाने येणाऱ्या बसची धास्ती, बसमध्ये बसल्यानंतर अपघाताची चिंता आणि लोकलमध्ये चढल्यानंतर गर्दीबरोबरच भांडण किंवा हल्ल्याची भीती हा मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनत आहे. यासाठी केवळ चालक किंवा एखाद्या कर्मचाऱ्याला दोष देऊन चालणार नाही. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील अनेक प्रश्नांकडे गांभीर्याने पाहावे लागेल. कंत्राटीकरण असल्याने नोकरीची शाश्वती नाही, चालकांवर असलेला कामाचा ताण, दीर्घ कामाचे तास, अपुरी विश्रांती, वाहनांची वेळेवर देखभालीचा अभाव, रस्त्यांवरील वाढती वाहतूक, नियमांचे उल्लंघन आणि काही ठिकाणी अपुरी पायाभूत सुविधा या सर्व कारणांचा एकत्रित परिणाम अपघातांमध्ये दिसून येतो. प्रत्येक अपघातानंतर चौकशीची घोषणा होते; परंतु त्याचे निष्कर्ष आणि त्यानंतर झालेली सुधारणा चर्चेत येते ती दुसरा अपघात होईपर्यंत. लोकल रेल्वेतील हिंसाचाराच्या घटनांमुळे आणखी एक प्रश्न समोर येतो. गर्दी वाढत आहे, परंतु सुरक्षा व्यवस्था त्याच वेगाने मजबूत होताना दिसत नाही. प्रत्येक महत्त्वाच्या स्थानकावर आणि गाड्यांमध्ये प्रभावी सुरक्षा, अधिक गस्त, सीसीटीव्हीचे काटेकोर निरीक्षण आणि तातडीने प्रतिसाद देणारी यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज आहे. त्याचबरोबर प्रवाशांनीही संयम आणि सामाजिक जबाबदारीचे भान ठेवणे तितकेच आवश्यक आहे. मुंबईकर कर भरतात, तिकीट काढून प्रवास करतात आणि सार्वजनिक सेवांवर विश्वास ठेवतात. त्या बदल्यात त्यांना सुरक्षित प्रवास मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. अपघात झाल्यानंतर केवळ नुकसानभरपाई जाहीर करून किंवा चौकशी समिती नेमून जबाबदारी संपत नाही. नागरिकांना प्रतिबंधात्मक उपाययोजना, पारदर्शक चौकशी आणि दोषींवर कठोर कारवाई अपेक्षित आहे.

## संस्कृत सुभाषित

शरदि न वर्षति गर्जति । वर्षति वर्षासु नि:स्वतो मेघ:।
नीचो वदति न कुरुते । न वदति सुजन: करोत्येव।।
अर्थ : शरद ऋतुत मेघ नुसताच गर्जतो, वर्षा ऋतुत न गर्जणारा मेघ बरसतो, दुष्ट नुसताच बडबडतो, काही करत नाही, सज्जन बोलत नाहीत तर करूनच दाखवतात.

## गुरु वचन

### प्रगतीसाठी मत्सर नव्हे, प्रेरणेची गरज

मत्सर करणारा माणूस प्रगती करण्याऐवजी इतरांच्या प्रगतीत अडथळे उत्पन्न करीत असतो. असा माणूस मानसिक कुरापतीमुळे स्वत: महत्त्वकांक्षी नसतोच उलट स्वत:च्या व इतरांच्या प्रगतीतील अडसर असतो. त्याची विकृत व संकुचित मानसिकता म्हणत असते कि, मी बसलो आहे तर तूही पुढे जाऊ नकोस. पुढे जाण्यासाठी, प्रगती करण्यासाठीही मत्सराची नव्हे तर प्रेरणेची गरज असते. एखाद्याला एखादी गोष्ट उत्तमरित्या करताना पाहून त्यापासून प्रेरित होणे व त्यांचे अनुकरण करणे माणसाला झुंजार व प्रगतिशील बनवते. तसेच स्पर्धेची भावना पुढे जाण्यास मदत करते. प्रत्येक यशस्वी व्यक्तिने कोणाकडून तरी प्रेरित होऊन व त्याच्या गुणांचे अनुकरण करूनच यश संपादन केलेले असते. कोणाचा मत्सर करून नव्हे. मत्सरामुळे तर आपले भविष्य व करियर दोन्हीही नष्ट होते. म्हणूनच मत्सर जाळून प्रेरणा पाळायला, जोपासणे आवश्यक आहे.

## उपदेशकथा




### पैशाने समाधान नाही

ब्रह्मज्ञानी आज्ञवलक्य सधन गृहस्थाश्रमी होता. त्याला दोन बायका होत्या. एकीचे नाव मैत्रेयी व दुसरीचे नाव कात्यायनी. एके दिवशी याज्ञवलक्याने मैत्रेयीला हाक मारली व तो तिला म्हणाला, 'मैत्रेयी ! मी आता संन्यास घेणार आहे. म्हणून तू आणि कात्यायनी दोघींमध्ये माझ्या संपत्तीची वाटणी करून देतो.' कात्यायनी संसारी वृत्तीची साधी बायको होती. मैत्रेयी अध्यात्मवृत्तीची बायको होती. तिला पतीच्या संपत्तीची वाटणी हवी होती. परंतु या नश्वर संपत्तीची नको होती. तिला खरे समाधान देणाऱ्या ब्रह्मविद्येची संपत्ती पाहिजे होती. ती पवित्र संपत्ती याज्ञवलक्यपाशी आहे हे तिला माहीत होते. तिने पतीला विचारले, 'हे भगवन पृथ्वीच्या मोलाइतके द्रव्य जर मला मिळाले. तर मी मुक्त होईन का?' याज्ञवलक्याने तिला उत्तर दिले, 'मैत्रेयी, तूर म्हणतेच ते खरे आहे. द्रव्याने अमृत मिळत नाही. यावर मैत्रेयी म्हणाली, 'द्रव्याने जर अमृतत्व मिळत नाही तर ते घेऊन मी काय करू? अमृतत्व कसे मिळेल ते मला सांगा.' याज्ञवलक्य प्रसन्न होऊन म्हणाला, 'मैत्रेयी, तू अत्यंत प्रिय भाषण करीत आहेस. ये बैस. ते ज्ञान तुला मी सांगतो.' अखेर आपला आत्मा हाच समाधानाचे व प्रेमाचे मूलस्थान आहे असे सांगून त्या आत्म्यालाच पाहण्याचा प्रयत्न करावा. त्याच्याविषयीच ऐकावे. चिंतन करावे आणि त्याचाच ध्यास लावून घ्यावा. कारण त्याचे ज्ञान झाले की सर्व जगाचे ज्ञान होते.' असे याज्ञवलक्य म्हणाला. पैसा मोठा धोका देतो. व्यवहाराला तो अवश्य लागतो. पण त्याचा आधार वाटतो. त्यामुळे त्याचे प्रेम ईश्वरदर्शनाच्या आड येते.

कथा उपदेश : पैशाचे प्रेम नसणे ही खरी संताची हृदयातील खूण आहे.

## पंचांग



| | |
|---|---|
| पंचांग | २९:१६:५५+ |
| २१ जुलै २०२६ | नक्षत्र:चित्रा २०:४८:४८ |
| मंगळवार | योग:सिद्ध १८:२४:४८ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:विष्टि १६:३५:२१ |
| आषाढ शके | करण:बव २९:१६:५५+ |
| संवत्– १९४८ | सूर्य:कर्क |
| संवत्सर – पराभवनाम | चन्द्र:तुला०७:५४:१० |
| अयन– दक्षिणयन | हिजरी सन् – १४४८ |
| मास– आषाढ | मुस्लिम मास – सफर |
| ऋतु– सौर वर्षा | तारीख – ६ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:अष्टमी | दुर्गाष्टमी |

## दै.'संध्या'धमाल सूडोकु क्र. १०१७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | | 7 | | 5 | 3 | | 1 |
| 5 | | | | | | | | 6 |
| | | | | | 3 | 2 | | 4 |
| | 5 | 3 | | 7 | 4 | 9 | | |
| | | 4 | | 2 | | 1 | | |
| | | 6 | 3 | 1 | | 4 | 7 | |
| 6 | | 7 | 9 | | | | | |
| 4 | | | | | | | | 7 |
| 3 | | 8 | 2 | | 7 | | 4 | 9 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०१६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7 | 6 | 2 | 8 | 5 | 3 | 4 | 9 |
| 5 | 3 | 2 | 1 | 4 | 9 | 8 | 7 | 6 |
| 9 | 4 | 8 | 6 | 7 | 3 | 2 | 1 | 5 |
| 4 | 6 | 9 | 5 | 3 | 2 | 7 | 8 | 1 |
| 8 | 2 | 1 | 7 | 6 | 4 | 5 | 9 | 3 |
| 3 | 5 | 7 | 8 | 9 | 1 | 4 | 6 | 2 |
| 7 | 9 | 3 | 4 | 2 | 6 | 1 | 5 | 8 |
| 6 | 8 | 5 | 3 | 1 | 7 | 9 | 2 | 4 |
| 2 | 1 | 4 | 9 | 5 | 8 | 6 | 3 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७१८ – पासारोवित्झचा तह – ऑट्टोमन साम्राज्य, ऑस्ट्रिया व व्हेनिसचा राष्ट्रांमध्ये.
- १७७४ – कुचुक-कैनार्जीची संधी – ऑट्टोमन साम्राज्य व रशियाने युद्ध संपवले.
- १८३१ – लिओपोल्ड पहिल्याचा बेल्जियमच्या राजेपदी राज्याभिषेक.
- १८६१ – अमेरिकन गृहयुद्ध – बुल रनची पहिली लढाई.
- १९२५ – अमेरिकेच्या डेटन, टेनेसी शहरात उत्क्रांतीवाद शिकवल्याबद्दल जॉन टी. स्कोप्स या शिक्षकाला १०० डॉलरचा दंड.

### राष्ट्रीय

- १८७९ – इंग्रज अधिकारी डॅनियल याने पंढरपूरच्या वाटेवर देवरनावडगी येथे एका बौद्ध विहारात झोपलेल्या वासुदेव बळवंत फडके यांच्यावर झडप घालून त्यांना अटक केली.
- १९३५ – मुंबई मराठी साहित्य संघाची स्थापना.

### जन्म

- ई.स.पू. ३५६ – सिकंदर.
- १४१४ – पोप सिक्स्टस चौथा.
- १८९९ – अर्नेस्ट हेमिंग्वे, अमेरिकन लेखक.
- १९१० – वि. स. पागे, महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी सभापती, तसेच रोजगार हमी योजना अंमलात आणणारे नेते.
- १९३४ – चंदू बोर्डे, भारतीय क्रिकेट खेळाडू.
- १९४५ – बॅरी रिचर्ड, दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट खेळाडू.
- १९४७ – चेतन चौहान, भारतीय क्रिकेट खेळाडू.

### निधन

- १४२५ – मॅन्युएल दुसरा पॅलिओलोगस, बायझेन्टाईन स्राट.
- १७९६ – रॉबर्ट बर्न्स, स्कॉटिश कवी.
- १९३६ – जॉर्ज मायकेलिस, जर्मनीचा चान्सेलर.

## : SMS :

Teacher: Beta batao, agar tumhare paas 10 aam hain aur main 5 maang lu to kitne bachenge?
Student: 10 hi bachenge ma'am.
Teacher: Wo kaise?
Student: Kyunki main dunga hi nahi

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.१ | २३.६ |
| अहमदनगर | २९.४ | २३ |
| अकोला | ३२.७ | २५.८ |
| अमरावती | ३४.३ | २५.७ |
| बीड | ३५.३ | २६.१ |
| भंडारा | ३७.३ | २६.१ |
| बुलढाणा | ४३.६ | ३१.९ |
| चंद्रपूर | ३५.१ | २५.७ |
| चेन्नई | ३९.३ | ३१.२ |
| नवी दिल्ली | ४४.४ | ३९.७ |
| धुळे | ३४.७ | २६.२ |
| गोंदिया | ३४.९ | २५.२ |
| जळगाव | ३४.३ | २५.५ |
| कोल्हापूर | २६.१ | २३.१ |
| लातूर | ३२.४ | २४.३ |
| मुंबई | ३३.९ | ३०.३ |
| नागपूर | ३८.७ | २६.६ |
| नांदेड | ३६.७ | २५.५ |
| नंदूरबार | ३२.१ | २४.९ |
| नाशिक | २६.६ | २३.७ |
| पुणे | २४.५ | २२.४ |
| पंढरपूर | ३२.५ | २४.३ |
| सातारा | २५.७ | २३ |
| सांगली | २९.४ | २३.३ |
| सोलापूर | ३३ | २४.६ |
| वर्धा | ३६.७ | २६ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा :पश्चिम प्रतिष्ठित व्यक्तींची भेट फायदेशीर ठरणार आहे.

**तुळ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत.

**वृषभ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: उत्तर आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील.

**वृश्चिक :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा:पूर्व चैन करण्याकडे ओढा राहील. व्यापारात नवीन संबंध फायदेशीर ठरतील. वहान चालवतांना काळजी घ्या.

**मिथुन :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पश्चिम कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकार्य कमी प्रमाणात मिळेल.

**धनु :** शुभ रंग :निळा,शुभ दिशा:पश्चिम आर्थिक बाबतीमधील प्रकरणे सुरळीत पार पडतील. आजचा दिवस शुभ आहे.

**कर्क :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल.

**मकर :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा: उत्तर प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल.

**कुंभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत.

**कन्या :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा: उत्तर व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे.

**मीन :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०१७



### आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

### उभे शब्द

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार, ५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार ओळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा, ३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

### जम्बो शब्दकोडे क्र. १०१६ चे उत्तर

आडवे उत्तर : १.रातोरात ४.छायाचित्र ६.जन गण मन ११.रुपाया १३.नवार १४.जर १५.खराब १७.भारवाहक १९.जून २१.दलाल २३.जमा २५.शाहीर २७.कडकड २९.मतदार ३१.नगद ३२.कारण ३४.धनी ३५.कर्म ३६.पाळीव ३८.विणकर ४०.पालम ४२.लघु ४३.जुना ४४.मातीमोल ४६.नगर ४८.तनय ५१.यमल ५२.हकनाक ५४.आजतक ५६.किसान ५८.गवगवा ५९.परागंदा ६०.धमाल ६१.तेरडा ६२.नत ६४.अननस ६५.सर ६६.आज ६७.प्रवाह ६९.कबरस्तान ७१.सर ७२.नरबळी ७४.दर्द ७५.जनककन्या ७८.तलाशी ७९.समस्त ८०.नातलग ८१.रमा

उभे उत्तर : २.तोतरा ३.तरू ४.छाया ५.चिक्कार ६.जनकजननी ७.नवा ८.गरजू ९.मज १०.नरवर १२.पायल १५.खडक १६.बदक १७.भारत १८.वावर २०.नशा २२.लाडका २४.माग २६.हीरक २८.डहाळी २९.मण ३०.दाभण ३३.रस्सी ३४.धरती ३६.पाळत ३७.वलय ४१.मनकवडा ४५.मोहन ४७.रविवासर ४९.नजरानजर ५०.तेज ५३.नागर ५४.आदानप्रदान ५५.तक्क्या ५७.सालस ६०.धनवान ६१.तेजाब ६३.तवा ६५.सनदशीर ६६.आसपास ६८.हस्तक ६९.कळी ७०.रयत ७३.रचना ७५.जस्त ७६.कट्टा ७७.न्यायी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# श्री श्री जगन्नाथ रथयात्रा सोहळा जल्लोषात

## आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ - इस्कॉन, पुणे यांच्यातर्फे आयोजन ; यंदा तब्बल १ लाख भाविकांना महाप्रसाद

■ पुणे (दै. संध्या)



जय जगन्नाथ, जय बलराम, जय सुभद्रा... च्या अखंड जयघोषात पुण्यामध्ये श्री श्री जगन्नाथ रथयात्रा सोहळा जल्लोषात साजरा झाला. विविध राज्यातील पारंपरिक वाद्यांचा गजर तसेच मिरवणुकीतील कारंजे आणि हायड्रोलिक हत्ती या विशेष आकर्षणांचा अनुभव घेत त्यावर पुष्पवृष्टी करीत पुणेकरांनी या यात्रेचे ठिकठिकाणी मोठया उत्साहात स्वागत केले. ओडिसामधील जगन्नाथ पुरी येथील रथयात्रेच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ - इस्कॉन, पुणे यांच्यातर्फे आयोजित रथयात्रेत हजारो भाविक पारंपरिक वेशात सहभागी झाले होते. टिळक रस्त्यावरील स.प.महाविद्यालय येथून जगन्नाथ रथयात्रा सोहळ्याला प्रारंभ झाला. इस्कॉन कात्रज-कोंढवा रस्ता, पुणे मंदिरातील भगवान जगन्नाथ, बलराम आणि सुभद्रा यांना खास दर्शनासाठी रथावर आणले होते. इस्कॉन संस्थेचे संन्यासी परम पूज्य लोकनाथ स्वामी, इस्कॉन मंदिराचे अध्यक्ष राधेश्याम प्रभू, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार श्रीकांत भारतीय, हेमंत रासने, निरंजन डावखरे, महापौर मंजुषा नागपुरे, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष आणि भाजपचे सरचिटणीस राजेश पांडे, कोहिनूर ग्रुपचे कृष्णकुमार गोयल यांसह पुण्यातील नगरसेवक यांच्या उपस्थितीत भगवान जगन्नाथ, बलदेव आणि सुभद्रा यांची आरती करून रथयात्रेला सुरुवात झाली. यावेळी इस्कॉन मंदिराचे उपाध्यक्ष संजय भोसले, मंदिराचे प्रवक्ते जनार्दन चितोडे, रथ यात्रेचे समन्वयक अनंतगोप प्रभू, जनसंपर्क प्रमुख प्रसाद कारखानीस तसेच राधिका विनोद प्रभू, सौम्य निताई प्रभू, ॲड. अभिजित साकुरकर, सहस्र तीर्थ प्रभू, अमर सोनवणे, पुजारी कौस्तुभ प्रभू आणि रूप गोस्वामी प्रभू आणि भक्त सेवा प्रभू उपस्थित होते. रथयात्रेचे यंदा १० वे वर्ष होते.

भाविक अतिशय जल्लोषात हरे कृष्ण महामंत्राचे कीर्तन आणि त्यावर भाव विभोर होऊन भक्त भगवान जगन्नाथाच्या रथासमोर नृत्य करीत होते. रथ यात्रेच्या मार्गावर भव्य रांगोळ्यांच्या गालीच्यावर रथ हजारो भाविकांतर्फे ओढला जात होता. स.प.महाविद्यालय, अभिनव महाविद्यालय चौक, बाजीराव रस्ता, शनिपार चौक, नगरकर तालीम चौक, लक्ष्मी रस्ता, शगुन चौक, रमणबाग शाळा, ओंकारेश्वर मंदिर, बालगंधर्व रंगमंदिर, जंगली महाराज रस्ता, खंडुजीबाबा चौक, टिळक चौक, टिळक रस्ता मार्गे स.प.महाविद्यालय येथे रथयात्रेचा समारोप झाला. मार्गावर गीता आणि भागवतावर आधारीत पुस्तकांचे आणि प्रसादाचे वितरण चालू होते.

झुलणाऱ्या हत्तीवर आरूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेषभूषेतील तसेच नृसिंह देव, वराह देव आणि बालाजींच्या वेशभूषेतील कलाकार लक्ष वेधून घेत होते.

भगवान जगन्नाथ, भगवान बलराम आणि सुभद्रा लोकांना दर्शन, आशीर्वाद आणि कृपा देण्यासाठी रस्त्यावर येतात. जगन्नाथ पुरी येथे शतकानुशतके ही रथयात्रा काढली जाते. हा सोहळा साजरा करण्यासाठी जगन्नाथ पुरी येथे लाखो लोक जमतात. परंतु जगन्नाथ पुरी येथे प्रत्येकजण वैयक्तिकरित्या जाऊ शकत नाही. त्यामुळे इस्कॉनचे संस्थापक आचार्य श्रील भक्तीवेदांत स्वामी प्रभुपाद यांनी भगवान जगन्नाथाची कृपा जगभर पसरवण्यासाठी रथयात्रा सुरू केली.

विशेष म्हणजे स्वयंसेवक रथ यात्रा गेल्यानंतर मार्गावर पडलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या हा कचरा उचलून घेत होते. सायंकाळी आरती, दर्शन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. रथयात्रेतील रथाची उंची २० फूट इतकी असून फुलांसह रंगीबेरंगी कापडांनी रथावर सजावट करण्यात आली होती.

समारोपानंतर भगवंतांना ५६ भोगांचा नैवेद्य अर्पण करून आरती झाली. जवळपास २० हजार भाविकांना प्रसाद वाटप महाविद्यालयाच्या प्रांगणात रथयात्रेच्या सुरुवातीला आणि समारोपानंतर झाले. तर, रथयात्रा मार्गावर १ लाख प्रसादाची पाकिटे वाटण्यात आली.

# स्मार्ट मीटर : शंका दूर, प्रतिसाद भरपूर

## पुणे परिमंडलात १४ लाखांवर मीटर कार्यान्वित



■ पुणे (दै. संध्या)

महावितरणतर्फे राबविण्यात येत असलेल्या स्मार्ट मीटर मोहिमेला पुणे शहरात आणि परिसरात ग्राहकांकडून प्रचंड सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. ग्राहकांच्या मनातील शंकांचे निरसन करण्यासाठी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये जाऊन थेट मेळावे घेत आहेत. या जनजागृतीमुळे पुणे परिमंडलात एकूण १४,१३,१९३ स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. स्मार्ट मीटरच्या जनजागृतीसाठी मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी मंडलनिहाय पूर्णवेळ पथके तयार केली आहेत. प्रत्येक पथकांमध्ये दोन अभियंत्यांसह ५ जणांचा समावेश असून, ही पथके मोठमोठ्या गृहनिर्माण संस्थांमध्ये जाऊन तेथील सभासदांना एकत्र करुन स्मार्ट मीटरचे फायदे समजावून सांगत आहेत. त्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांचा गैरसमज दूर करत आहेत. एका आठवड्यात या पथकांनी सुमारे २०० ठिकाणी मेळावे घेऊन ४० हजारांहून अधिक वीज ग्राहकांची जनजागृती केली आहे. तसेच दोन चित्ररथ (LED Van) देखील गर्दीच्या ठिकाणी स्मार्टमीटरची जनजागृती करत आहेत.

पुणे परिमंडलात एकूण ३९ लाख वीजमीटर आहेत. त्यापैकी गणेशखिंड शहर मंडलात ५,२८,३२६, रास्तापेठ शहर मंडलामध्ये ५,२४,२२२ आणि पुणे ग्रामीण मंडलात ३,६०,६४५ स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. स्मार्ट मीटर हे ग्राहकांच्या सोयीसाठी आणि वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. सोशल मिडियाद्वारे पसरविल्या जाणाऱ्या अफवांवर विश्वास न ठेवता, महावितरणच्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. आपल्या सोसायटीत कर्मचाऱ्यांची पथके आल्यास त्यांच्याकडून शंकांचे निरसन करून घ्यावे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून महावितरणला सहकार्य करावे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### एक कोटींची रोकड लुटण्याचा कट उधळला! खासगी कारचालकच निघाला मास्टरमाइंड

पुणे : दैनिक संध्या



बँकेत भरण्यासाठी नेण्यात येणारी तब्बल एक कोटी रुपयांची रोकड लुटण्याचा धाडसी कट नऱ्हे पोलिसांनी उधळून लावला. पैसे वाहून नेण्यासाठी नेहमीप्रमाणे भाड्याने घेतलेल्या खासगी कारचालकानेच साथीदारांसह कट रचल्याचे तपासात समोर आले आहे. पोलिसांनी तिघांना अटक केली असून दोघे साथीदार फरार आहेत. अटक करण्यात आलेल्यांमध्ये विक्रम चाकणकर (४४), अमेय कार्ले (४६) आणि गणेश कदम (३३, सर्व रा. धायरी) यांचा समावेश आहे. याप्रकरणी हर्षवर्धन पवार (रा. तपोधाम कॉलनी, तळेगाव दाभाडे) यांनी नऱ्हे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार १८ जुलै रोजी दुपारी सिंहगड रस्त्यावरील ब्रह्मा हॉटेल ते खेड शिवापूर पोलीस चौकीदरम्यान घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी पवार यांचा स्टेशनरी पुरवठ्याचा व्यवसाय असून, विविध व्यवहारातून जमा झालेली एक कोटी रुपयांची रोकड बँकेत भरण्यासाठी त्यांनी नेहमीप्रमाणे खासगी सॅन्ट्रो कार भाड्याने घेतली होती. पवार आणि त्यांचे सहकारी किरण आपटे हे रोकड असलेल्या दोन बॅगांसह कारमध्ये बसले होते. चालक विक्रम चाकणकर याला या व्यवहाराची माहिती होती. नऱ्हे येथील एचडीएफसी बँकेकडे जात असताना मोटारसायकलवरून आलेल्या चौघांनी कार अडवली. त्यातील अमेय कार्ले याने स्वतःला पोलीस असल्याचे सांगत, "तुमच्याकडे बेकायदा पैसा आहे, गाडी बाजूला घ्या," अशी बतावणी केली. पवार व त्यांचे सहकारी घाबरल्याचा फायदा घेत कार्ले आणि कदम यांनी कारमध्ये घुसून रोकड असलेल्या बॅगा हिसकावण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, चालक चाकणकर याने कार थेट खेड शिवापूर पोलीस चौकीकडे नेली. तेथे चौकशीदरम्यान हा प्रकार नऱ्हे पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याचे स्पष्ट झाल्यानंतर संबंधित माहिती नऱ्हे पोलिसांना देण्यात आली. पुढील चौकशीत चालक चाकणकर यानेच साथीदारांसह रोकड लुटण्याचा कट रचल्याचे निष्पन्न झाले. नऱ्हे पोलिसांनी तिघांविरुद्ध दरोड्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून अटक केली असून फरार असलेल्या दोघांचा शोध सुरू आहे. पोलीस उपनिरीक्षक विजयसिंह घाडगे पुढील तपास करीत आहेत.

### शिवाजीनगरची वाहतूक कोंडी फोडणार

पुणे : दैनिक संध्या

शिवाजीनगर परिसरातील वाढती वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महापालिकेकडून साखर संकुल ते जुना पुणे-मुंबई रस्ता येथे उड्डाणपूल आणि समतल विलगक उभारण्यात येणार आहे. या कामासाठी ७३ कोटी ५२ लाख रुपयांच्या खर्चाला स्थायी समितीने गुरुवारी मंजुरी दिली. संबंधित उड्डाणपुलाचे काम दीड वर्षात पूर्ण होणार असल्याने शिवाजीनगरमधील वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मदत होणार आहे. गणेशखिंड रस्त्यावरून शिवाजीनगरकडे येताना कृषी महाविद्यालयापासून ते सिमला ऑफिस चौक, संचेती रुग्णालयाजवळील चौक आणि अभियांत्रिकी महाविद्यालयासमोरील चौकात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होती.

# 'बार्टी'च्या कौशल्य प्रशिक्षणातून १४ हजार तरुणांना संधी

■ पुणे (दै. संध्या)

■ सुमारे ९ हजार तरूणांना रोजगार व स्वयंरोजगाराची वाट

बदलत्या रोजगार बाजारपेठेत केवळ पदवी नव्हे, तर उद्योगांना आवश्यक असलेली कौशल्ये महत्त्वाची ठरत आहेत. ही गरज ओळखून 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थे'ने (बार्टी) अनुसूचित जातीच्या तरुणांच्या हाताला कौशल्याचे आणि रोजगाराचे मोठे बळ दिले आहे. गेल्या चार वर्षांतील कौशल्य विकास कार्यक्रमातून गेल्या चार वर्षांत १४ हजार १८९ जणांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. यापैकी तब्बल ९ हजार तरुणांना रोजगार किंवा स्वतःच्या व्यवसायाचे साधन उपलब्ध झाले आहे. रोजगाराचे स्वरूप झपाट्याने बदलत असताना पारंपरिक शिक्षणासोबतच अद्ययावत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण असणे काळाची गरज बनली आहे. ही गरज लक्षात घेऊन बार्टीकडून सन २०२२ ते २०२६ या कालावधीत राज्यभरात तब्बल १०४ विविध कौशल्य अभ्यासक्रम राबविण्यात आले. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सायबर सुरक्षा, डेटा ॲनालिटिक्स, क्लाऊड कॉम्प्युटिंग, फुल स्टॅक डेव्हलपमेंट, इलेक्ट्रिक व्हेईकल, हेल्थकेअर, बँकिंग, लॉजिस्टिक्स आणि डिजिटल सेवा अशा रोजगाराभिमुख प्रशिक्षणाचा समावेश आहे. या अभ्यासक्रमांसाठी खासगी संस्थांमध्ये २० हजार ते एक लाख रुपयांपर्यंत शुल्क आकारले जाते. मात्र, बार्टीकडून हे प्रशिक्षण मोफत दिले जात असून प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना दरमहा चार ते सहा हजार रुपयांचे विद्यावेतनही दिले जाते.

# पुणे शहरात जड-अवजड वाहनांना प्रवेशबंदी

■ पुणे (दै. संध्या)

**पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन**

शहरात पावसाळ्यात जड वाहने, मालवाहु वाहने अडकण्याच्या किंवा बंद पडण्याच्या घटना घडून वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी प्रतिबंधक उपाययोजना म्हणून जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये ९ जुलै पासून पुढील आदेशापर्यंत जड-अवजड वाहनांस प्रवेश बंदी केली आहे. या वाहनांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पर्यायी मार्ग : सोलापूर कडून मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांनी केडगाव-चौफुला-न्हावरे-तळेगाव ढमढेरे-शिक्रापूर-चाकण मार्गे व उरळी कांचन-कोरेगाव मुल – अष्टापुर – तळेगाव ढमढेरे - शिक्रापूर-चाकण मार्गे जावे. मुंबई येथून सोलापूरकडे जाणाऱ्या वाहनांनी तळेगाव दाभाडे-चाकण-शिक्रापूर-तळेगाव ढमढेरे-न्हावरे-केडगाव-चौफुला सोलापूर महामार्ग मार्गे व तळेगाव दाभाडे-चाकण-शिक्रापूर-तळेगाव ढमढेरे-आष्टापूर-कोरेगाव मुल-उरळी कांचन मार्गे तसेच कात्रज मंतरवाडी फाटा-वडकी-दिवेघट-सासवड-जेजुरी-मोरगाव-सुपे-केडगाव चौफुला मार्गाचा वापर करावा. मुंबई येथून अहिल्यानगरकडे जाणाऱ्या वाहनांनी तळेगाव, चाकण, खेड, मंचर, नारायणगाव, आळेफाटा, अहिल्यानगर मार्गाचा वापर करावा. तर अहिल्यानगर येथून मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांनी शिक्रापूर –चाकण-तळेगाव मार्गाचा वापर करावा. सासवड येथून सोलापूरकडे जाणाऱ्या वाहनांनी सासवड-जेजुरी-मोरगाव-सुपे-केडगाव-चौफुला मार्गाचा वापर करावा. शहरात मालाची चढ-उतार करणाऱ्या वाहनांनी रात्री ११ ते सकाळी ६ वा. पर्यंत खालील मार्गाने ये-जा करावी. अहिल्यानगर कडून पुणे शहरात येणाऱ्या वाहनांनी नगर रोडने वाघोली-खराडी बायपास- शास्त्रीनगर चौक-गोल्फ क्लब चौक-आळंदी रोड जंक्शन-चंद्रमा चौक-पोल्ट्री चौक-हॅरीश ब्रिज मार्गे इच्छित स्थळी जातील. सोलापूरकडून पुणे शहरात ये-जा करण्यासाठी मगरपट्टा-भैरोबानाला-लुल्ला नगर चौक- गंगाधाम चौक-मार्केट यार्ड मार्गाचा वापर करावा.

सातारा- सांगली -कोल्हापूरकडे जाणारी वाहने बेंगळुरू महामार्गमार्गे, नवले ब्रिज, कात्रज चौक, मार्केट यार्ड मार्गाचा वापर करतील. तर मुंबई-नाशिक कडून पुणे शहरात येणारी वाहने हॅरिश ब्रिज-बोपोडी-चंद्रमा-गोल्फ चौक, मार्केट यार्ड मार्गाचा वापर करतील.

# 'माऊली' नाट्यप्रयोगातून संत ज्ञानेश्वरांच्या जीवनचरित्राचा भावस्पर्शी आविष्कार

■ सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे २२ जुलै रोजी पुण्यात 'माऊली' या विशेष आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

■ संत ज्ञानेश्वरांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त भक्ती, अध्यात्म आणि संस्कृतीचा दिव्य संगम

■ पुणे (दै. संध्या)



महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त 'माऊली' या विशेष आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. २२ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता भरत नाट्य मंदिर, पुणे येथे हा विशेष कार्यक्रम सादर होणार आहे. 'माऊली' हा संत ज्ञानेश्वरांच्या जीवनप्रवासावर आधारित नाट्यमय सांस्कृतिक आविष्कार असून, त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग, अध्यात्म, भक्ती, समाजप्रबोधन आणि मानवतेचा संदेश प्रभावी रंगमंचीय सादरीकरणातून उलगडण्यात येणार आहे. संगीत, अभिनय, नृत्य आणि नेपथ्य यांच्या सुरेख संगमातून संत परंपरेचा वैभवशाली वारसा रसिकांसमोर साकारला जाणार आहे. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या साहित्य, विचार आणि अध्यात्माच्या माध्यमातून समाजाला समता, करुणा, विश्वबंधुत्व आणि मानवकल्याणाचा संदेश दिला. 'दुरितांचे तिमिर जावो' हा त्यांच्या पसायदानमधील सार्वकालिक संदेश आजही समाजाला प्रेरणा देणारा आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून संत ज्ञानेश्वरांचे जीवनकार्य आणि त्यांची आध्यात्मिक परंपरा नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्यभर विविध आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, 'माऊली' हा कार्यक्रम त्या उपक्रममालिकेतील एक महत्त्वाचा सांस्कृतिक उपक्रम आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध संतपरंपरेचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. राज्याच्या समृद्ध संतपरंपरेचे, आध्यात्मिक वारशाचे आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.

या कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून, पुणे व परिसरातील वारकरी, कला रसिक, विद्यार्थी, संशोधक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक व सांस्कृतिक पर्वाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

# महावितरणचे मोठे पाऊल!

■ पुणे (दै. संध्या)

स्मार्ट मीटर बसवण्याबाबत ग्राहकांच्या मनात असलेल्या शंकांचे निरसन करण्यासाठी 'महावितरण'कडून विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. स्मार्ट मीटर मोहिमेअंतर्गत महावितरणचे अधिकारी व कर्मचारी गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये जाऊन मेळावे घेत आहेत. त्यासाठी विशेष पथकांची निर्मिती करण्यात आली आहे. ही पथके मोठमोठ्या गृहनिर्माण संस्थांमध्ये जाऊन तेथील सभासदांना एकत्र करुन स्मार्ट मीटरचे फायदे समजावून सांगत आहेत. त्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांचे गैरसमज दूर करत आहेत, अशी माहिती महावितरणकडून निवेदनाद्वारे देण्यात आली.

# डॉ. दुधभाते नेत्रालय : वर्धापन दिन उत्साहात साजरा

■ पुणे (दै. संध्या)



डॉ. दुधभाते नेत्रालय आणि रेटिना सेंटरचा १५ वा वर्धापन दिन सोहळा नुकताच नेत्रालयाच्या परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेत्रतज्ज्ञ डॉ. रामचंद्र पाडळकर होते.

यावेळी नेत्रालयाचे संचालक डॉ. अनिल दुधभाते यांनी वर्धापन दिनानिमित्त आपल्या भावना व्यक्त करताना, एकाच दिवशी १०० लेसिक शस्त्रक्रिया करण्याचा संकल्प जाहीर केला. तसेच नेत्रालयाच्या गेल्या १५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीत योगदान देणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे, डॉक्टरांचे, कर्मचाऱ्यांचे आणि हितचिंतकांचे त्यांनी आभार मानले. "माझ्या नेत्रालयात येणारा प्रत्येक रुग्ण समाधानाने आणि नवी दृष्टी घेऊन घरी परतला पाहिजे, हीच आमची सेवा करण्यामागील प्रेरणा आहे," असेही ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात डॉ. रामचंद्र पाडळकर यांनी डॉ. दुधभाते नेत्रालयातील अत्याधुनिक सुविधा, दर्जेदार वैद्यकीय सेवा आणि रुग्णांप्रती असलेली स्नेहपूर्ण व संवेदनशील भूमिका यांचे कौतुक केले. डॉ. अनिल दुधभाते यांची कामाप्रती असलेली निष्ठा, समर्पण आणि संपूर्ण स्टाफची उत्कृष्ट कार्यपद्धती यांचा गौरव करत त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले. तसेच नेत्रालयाच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या.

या सोहळ्यास डॉ. दुधभाते यांच्या प्रेरणास्थान डॉ. डिंपल दुधभाते, हॉस्पिटलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंका एडके, डॉ. आसावरी चव्हाण, डॉ. आदिती एडगिरी, डॉ. उमेश कुलकर्णी, डॉ. स्नेहल मानपुत्र, शीतल हिराळकर, गौरी निमकर, गणेश मोटे, कोमल भोसले, नेत्रालयातील सर्व कर्मचारी तसेच डॉ. दुधभाते ऑप्टोमेट्री कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सेट परीक्षा दुसऱ्यांदा लांबणीवर

■ पुणे (दै. संध्या)

सहायक प्राध्यापक पदासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात येणारी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) दुसऱ्यांदा पुढे ढकलण्यात आली आहे. ६ सप्टेंबर रोजी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाची केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा होणार असल्याने सेट परीक्षा लांबणीवर टाकण्याचा निर्णय घेण्यात आला असून, आता २७ सप्टेंबर रोजी परीक्षा घेतली जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या सेट विभागाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे या बाबतची माहिती दिली. विद्यापीठ आणि वरिष्ठ महाविद्यालयात सहायक प्राध्यापक पदाची पात्रता परीक्षा घेण्यासाठी प्राधिकृत विभाग आहे.

# आकाशचा सोहम पाटील पुणे शहरात अव्वल

■ पुणे (दै. संध्या)




राष्ट्रीय स्तरावरील वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी मार्गदर्शन करणाऱ्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडच्या पुणे शाखेतील विद्यार्थी सोहम पाटील याने राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा अर्थात 'नीट यूजी २०२६'मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सोहमने ७२० पैकी तब्बल ६९५ गुण मिळवत अखिल भारतीय स्तरावर ५३ वा क्रमांक पटकावला असून, पुणे शहरात अव्वल स्थान मिळवल्याचा दावा संस्थेने केला आहे. आकाशच्या पुणे येथील पुलगेट शाखेच्या वर्गातील नियमित अभ्यासक्रमाचा विद्यार्थी असलेल्या सोहमच्या या यशामुळे संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. सातत्यपूर्ण मेहनत, दृढनिश्चय, शिस्तबद्ध अभ्यास आणि नियोजनबद्ध तयारीच्या जोरावर त्याने हे यश संपादन केले. त्याच्या या यशामागे संस्थेतील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि सुसंघटित शिक्षण पद्धतीचा महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे संस्थेने म्हटले आहे. पुण्यातील पुलगेट शाखेतीलच नियमित वर्गातील विद्यार्थी निखिल बेवल यानेही नीट यूजी २०२६ मध्ये उल्लेखनीय यश मिळवले आहे. निखिलने ७२० पैकी ६७५ गुण मिळवत अखिल भारतीय स्तरावर ३८९ वा क्रमांक प्राप्त केला आहे. सोहम आणि निखिल या दोन्ही विद्यार्थ्यांच्या यशामुळे पुणे शाखेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण कामगिरीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाल्याचे संस्थेने नमूद केले. आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडने नीट यूजी २०२६ मध्ये आपल्या विद्यार्थ्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले आहे. संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, यंदाच्या परीक्षेत आकाशच्या चार विद्यार्थ्यांनी देशातील पहिल्या दहा क्रमांकांमध्ये स्थान मिळवले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आळंदी म्हातोबा सोसायटीच्या चेअरमनपदी ज्ञानोबा शंकर शिवरकर यांची बिनविरोध

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : हवेली तालुक्यातील आळंदी म्हातोबाची येथील आळंदी म्हतोबा विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी ज्ञानोबा शंकर शिवरकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे परिसरातील सभासद आणि ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सोनाली देसाई यांनी काम पाहिले तर सोसायटीचे सचिव विवेक ठोंबरे यांनी मदत केली. नवनिर्वाचित चेअरमन ज्ञानोबा शिवरकर यांनी सभासदांचा विश्वास सार्थ ठरवत सोसायटीचा पारदर्शक कारभार, शेतकरी हिताच्या योजना प्रभावीपणे राबविणे आणि सभासदांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. या बिनविरोध निवडीबद्दल त्यांचे विविध मान्यवर, संचालक मंडळ, सभासद आणि ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्य , हवेली तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अजित दादा गट ) अध्यक्ष दिलीप वाल्हेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती सौ.मनीषा शंकर हरपळे,जेष्ठ नेते भगवान आण्णा जवळकर, अशोक भाऊ जवळकर, माजी पंचायत समिती सदस्य अरविंद शिवरकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

### पावसाळी आजारांचा धोका; ताप, डेंग्यू आणि मलेरियाबाबत सतर्क राहण्याचे आवाहन

STAR Health Insurance

बारामती (दैनिक संध्या) : पावसाळ्याच्या आगमनासोबत बारामती परिसरात ताप, डेंग्यू, मलेरिया आणि इतर संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आरोग्याबाबत अधिक सतर्क राहावे आणि लक्षणे दिसताच तातडीने वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने केले आहे. पावसाळ्यातील आजारांच्या पार्श्वभूमीवर कंपनीने महाराष्ट्रभर आपली आरोग्य सेवा मोहीम अधिक व्यापक केली आहे. स्टार हेल्थच्या आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील महाराष्ट्रातील आकडेवारीनुसार, ताप आणि संसर्गजन्य आजारांसाठी घरगुती आरोग्यसेवेचा लाभ घेणाऱ्यांच्या संख्येत तब्बल पाच पटीने वाढ झाली आहे. त्याचबरोबर डॉक्टरांचा ऑनलाइन सल्ला घेण्याकडेही नागरिकांचा कल वाढत आहे. आजाराची लक्षणे जाणवताच प्राथमिक वैद्यकीय मार्गदर्शन मिळविण्यासाठी नागरिक ऑनलाइन डॉक्टरांच्या सल्ल्याला प्राधान्य देत असल्याचे कंपनीने म्हटले आहे. या मोहिमेच्या माध्यमातून विमाधारकांना आजाराच्या सुरुवातीच्या टप्प्यातच योग्य वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. विमाधारकांना घरगुती आरोग्यसेवा किंवा नियोजित रुग्णालय प्रवेशासंदर्भातील मार्गदर्शनासाठी 'टॉक टू स्टार'च्या ७२०० २२२ ३३३ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. घरगुती आरोग्यसेवेसाठी १, तर नियोजित रुग्णालय प्रवेशाच्या मदतीसाठी २ क्रमांकाचा पर्याय निवडता येईल. बिगर-विमाधारक आणि सर्वसामान्य नागरिकांना स्टार हेल्थच्या ग्राहक अनुप्रयोगाच्या माध्यमातून मोफत चोवीस तास ऑनलाइन बाह्यरुग्ण वैद्यकीय सल्ला घेता येणार आहे.

### भूमिका तुम्हांला विकसित होण्यास मदत करतात : अब्रार काझी

पुणे (दैनिक संध्या) : झी टीव्ही वाहिनी ही नेहमीच देशभरातील प्रेक्षकांच्या मनाला भिडणाऱ्या भावनिक आणि हृदयस्पर्शी कथा सादर करण्यासाठी ओळखली जाते. 'गंगा माई की बेटियाँ', 'वसुधा' आणि 'तुम से तुम तक' ह्या तीनही मालिका टीआरपी चार्टमध्ये टॉप 5 मध्ये स्थान मिळवत प्रेक्षकांची मने जिंकत आहेत. आता लवकरच 'तू ही रे दिल में' या नवीन मालिकेद्वारे प्रेक्षकांना पुन्हा एकदा आकर्षित करण्यासाठी वाहिनी सज्ज झाली आहे. 15 जूनपासून प्रसारित होणाऱ्या या मालिकेत अब्रार काझी (संजय), प्रियांशी यादव (वृंदा) आणि सिमरन रावल (स्वाती) मुख्य भूमिकांमध्ये दिसणार आहेत. प्रेमकथेबरोबरच 'तू ही रे दिल में' ही नियती, नाती आणि आयुष्य बदलणाऱ्या निर्णयांची भावनिक कहाणी आहे. ही कथा आहे वृंदा या तरुणीची, जिचा श्रद्धा आणि नियतीवर ठाम विश्वास आहे. मात्र परिस्थिती तिच्या आयुष्यात असे वळण आणते की तिच्या विश्वासासमोर मोठे आव्हान उभे राहते. वृंदा, संजय आणि स्वाती यांच्या आयुष्यांचा प्रवास एकमेकांशी गुंफला जातो आणि त्यातून प्रेम, त्याग, हृदयभंग आणि कठीण निर्णयांनी भरलेली, भावनिक खोली असलेली आणि प्रेक्षकांना जवळची वाटणारी प्रभावी कथा उलगडत जाते.

# थेऊर ग्रामपंचायत फेर आरक्षणात गोलमाल झाल्याचा आरोप

लोणी काळभोर (दै. संध्या) :

हवेली तालुक्यातील थेऊर ग्रामपंचायतीच्या आगामी निवडणुकीसाठी झालेल्या वॉर्ड फेर आरक्षण प्रक्रियेवरून मोठा वाद निर्माण झाला असून, संपूर्ण प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर ग्रामस्थांनी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करुन गोलमाल झाल्याचा नागरिकांनी आरोप केला आहे . १२ जून २०२६ रोजी झालेल्या आरक्षण सोडतीनंतर वॉर्ड क्रमांक ४ च्या आरक्षणावर हरकत दाखल झाली होती. त्यानंतर प्रांताधिकारी स्तरावर सुनावणी होऊन अपर तहसीलदारांनी वार्ड क्रमांक ४ मधील फेर आरक्षणाबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला. मात्र, राज्य निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार १० जुलैपर्यंत अंतिम आरक्षण जाहीर होणे अपेक्षित असतानाही



थेऊरची अंतिम आरक्षण यादी प्रसिद्ध झाली नव्हती. दरम्यान, १६ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता, अपर तहसीलदार तृप्ती कोलते यांच्या स्वाक्षरीचे पत्र सोशल मीडियावर व्हायरल झाले.

या पत्रात १७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता विशेष ग्रामसभा घेऊन फेर आरक्षण सोडत होणार असल्याचे नमूद करण्यात आले

## १८ जुलैची आरक्षण प्रक्रिया वादाच्या भोवऱ्यात!

होते. तसेच ग्रामसभेच्या अध्यक्षपदी लोणी काळभोर मंडलाधिकारी लक्ष्मण बांडे यांची नियुक्ती करण्यात आल्याचा उल्लेख होता. मात्र, संबंधित मंडलाधिकारी लक्ष्मण बांडे यांना दूरध्वनीद्वारे विचारणा केली असता, मला या ग्रामसभेबाबत कोणताही लेखी अथवा तोंडी आदेश मिळालेला नाही, असे सांगितल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. परिणामी, १७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता, ग्रामस्थ मोठ्या संख्येने ग्रामपंचायत कार्यालयात जमा झाले परंतू ग्रामपंचायत प्रशासनाने अशा कोणत्याही ग्रामसभेची माहिती अथवा पत्र प्राप्त झाले नसल्याचे सांगितले, त्यामुळे त्यादिवशी कोणतीही ग्रामसभा आयोजित करण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये मोठा संभ्रम आणि संताप निर्माण झाला.

यानंतर १७ जुलै रोजी सायंकाळी सुमारे ६.३० वाजल्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस फलकावर १८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता विशेष ग्रामसभा होणार असल्याची नवीन सूचना लावण्यात आली. त्यानंतर रात्री ८ वाजता दवंडी देऊन ग्रामस्थांना माहिती देण्यात आली. त्यानुसार १८ जुलै रोजी मंडलाधिकारी लक्ष्मण बांडे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष ग्रामसभा घेण्यात आली आणि फेर आरक्षण प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

मात्र, या प्रक्रियेदरम्यान नागरिक व अधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक वाद निर्माण झाला. परिस्थिती तणावपूर्ण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अनेक ग्रामस्थांनी तात्काळ हरकती नोंदवून त्या ग्रामसभेच्या इतिवृत्तात समाविष्ट करण्याची मागणी केली. तसेच संपूर्ण फेर आरक्षण प्रक्रियेला आव्हान देणार असल्याचा इशाराही दिला. ग्रामस्थांनी आणखी गंभीर आरोप करत, प्रत्यक्ष ग्रामसभेत आरक्षणाची सोडत काढण्यात आलीच नाही, तर वार्डनिहाय आरक्षणाची संपूर्ण स्क्रिप्ट आधीच तयार करून आणण्यात आली होती आणि सभागृहात केवळ तिचे वाचन करण्यात आल्याचा दावा केला. कोणतीही सविस्तर चर्चा, हरकतींवरील विचार किंवा प्रत्यक्ष सोडत प्रक्रिया न करता केवळ औपचारिकता पार पाडण्यात आल्याचा आरोपही नागरिकांनी केला. यावेळी अनेक ग्रामस्थांनी उभे राहून आरक्षण प्रक्रियेचा निषेध नोंदविला.

याशिवाय ग्रामस्थांनी ग्रामसभा घेण्याच्या कायदेशीर प्रक्रियेवरही प्रश्न उपस्थित केले. ग्रामसभेची सूचना किमान तीन दिवस आधी दवंडी व अन्य माध्यमांतून नागरिकांना माहिती देणे आवश्यक असताना, केवळ एक दिवस आधी सायंकाळी नोटीस लावून दुसऱ्याच दिवशी ग्रामसभा घेण्यात आल्याने संपूर्ण प्रक्रिया नियमबाह्य असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तर काही ग्रामस्थांनी तासाभराच्या गोंधळात काय झाले आणि काय नाही हे कळालेच नाही, असे सांगितले. याबाबत निवडणूक अधिकारी तथा ग्रामसभेचे अध्यक्ष लक्ष्मण बांडे यांच्याकडे प्रतिक्रिया मागितली असता, "या प्रकरणातील माझे संपूर्ण म्हणणे ग्रामसभेच्या प्रोसिडिंग रजिस्टरमध्ये नोंदविलेले आहे," एवढीच प्रतिक्रिया दिली. यावेळी ग्रामस्थांनी या सर्व प्रकरणावर विभागीय आयुक्तांकडे दाद मागणार असल्याचे सांगितले.

## जागतिक क्लेफ्ट जागरूकता दिनानिमित्त स्माईल ट्रेन इंडियाचा जनजागृती उपक्रम

### ८ लाखांहून अधिक मोफत क्लेफ्ट शस्त्रक्रिया पूर्ण, लवकर निदानावर भर

नवी दिल्ली (दै. संध्या) :

दरवर्षी 20 जुलै रोजी जगभरात जागतिक क्लेफ्ट जागरूकता दिन (वर्ल्ड क्लेफ्ट अवेअरनेस डे) साजरा केला जातो. या दिवसाची सुरुवात वर्ष २०२५ मध्ये स्माईल ट्रेनने केली होती. क्लेफ्ट (फाटलेले ओठ आणि टाळू) याबाबत लोकांमध्ये जागरूकता वाढवणे आणि या विषयाला सार्वजनिक आरोग्याशी संबंधित महत्त्वाचा मुद्दा म्हणून समोर आणणे हा यामागचा उद्देश आहे. क्लेफ्टसह जन्मलेल्या प्रत्येक मुलाला वेळेवर आणि योग्य उपचार मिळावेत, हे सुनिश्चित करणे हा



या दिवसाचा मुख्य हेतू आहे. यावर्षी क्लेफ्ट उपचार क्षेत्रात काम करणाऱ्या देशातील आघाडीच्या स्वयंसेवी संस्था स्माईल ट्रेन इंडियाने एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. वर्ष 2000 पासून आतापर्यंत संस्थेने संपूर्ण भारतात 8 लाखांहून अधिक मुलांना मोफत क्लेफ्ट शस्त्रक्रिया मिळवून देण्यात मदत केली आहे. या मोठ्या यशानंतर आता संस्थेचा मुख्य भर लोकांमध्ये जागरूकता वाढवण्यावर आहे, जेणेकरून क्लेफ्टसह जन्मलेल्या प्रत्येक मुलाची वेळेत ओळख होईल आणि त्याला योग्य वेळी उपचार मिळू शकतील. यामुळे ही मुले निरोगी आणि चांगले आयुष्य जगू शकतील. भारतात दरवर्षी सुमारे 25 हजार मुले क्लेफ्ट (फाटलेले ओठ किंवा टाळू) सह जन्माला येतात. मात्र याबाबत असलेले गैरसमज, चुकीची माहिती आणि सामाजिक भेदभाव यामुळे अनेक मुलांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. उपचारांना उशीर झाल्यास मुलांना दूध पिण्यात अडचणी, कुपोषण, बोलणे आणि ऐकण्याच्या समस्या तसेच सामाजिक आणि भावनिक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. क्लेफ्टची वेळेवर ओळख करून योग्य वेळी शस्त्रक्रिया केल्यास मुलांवर अधिक प्रभावी उपचार करता येतात आणि त्यांना आवश्यक असलेल्या सर्व वैद्यकीय सेवांचा लाभ मिळू शकतो.जागतिक क्लेफ्ट जागरूकता दिनाचा उद्देश क्लेफ्टबाबतचे गैरसमज दूर करणे, लोकांना क्लेफ्टबाबत माहिती देणे आणि क्लेफ्टसह जन्मलेल्या प्रत्येक मुलाला वेळेवर योग्य उपचार मिळतील याची खात्री करणे हा आहे.

## कंत्राट टिकवण्यासाठी केटरर्सकडे खंडणीची मागणी

पुणे (दै. संध्या) :

'एमराल्ड हॉल'चे कंत्राट टिकवून ठेवण्यासाठी केटरिंग व्यावसायिकाकडून 'दि पुणे पोस्ट अँण्ड टेलिकॉम को-ऑप. क्रेडिट सोसायटी'च्या संचालकांनी ६० लाखांची खंडणी मागितल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत अजय सयाजीराव देसाई (वय ५९, रा. सिंहगड रस्ता) यांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी सदाशिव पेठेतील पुणे पोस्ट अॅण्ड टेलिकॉम को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे सचिव गणेश भोज, संचालक नागेश नलावडे, चेअरमन उमाकांत वालगुडे, दीपक धुमाळ, दिनेश खोडके, व्यवस्थापक राजन कामठे आणि नितीन वाघमारे या संशयितांवर खंडणीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी देसाई यांनी २०२१ मध्ये म्हाळुंगे येथील बंद असलेला एमराल्ड हॉल स्वखर्चाने नूतनीकरण करून सुरू केला होता. हॉलचा व्यवसाय चांगला सुरू झाल्याचे पाहून आरोपींनी रोख पैशांची मागणी केली.

## टाकेडाची क्यूडेंगा ही भारतात मंजुरी मिळालेली पहिली डेंग्यू लस

नवी दिल्ली (दै. संध्या) :

टाकेडा बायोफार्मास्युटिकल्स इंडिया प्रा. लि. ने आज ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाने (डीसीजीआय) वय वर्षे ४ ते ६० वयोगटातील व्यक्तींमध्ये डेंग्यू रोगाच्या प्रतिबंधासाठी टाकेडाच्या 'क्यूडेंगा' या डेंग्यू लसीला बाजार परवाना (सीटी-२०, नवीन औषधे आणि चिकित्सकीय चाचण्या (एनडीसीटी) नियम, २०१९) दिला आहे. क्यूडेंगा ही भारतात मंजूर झालेली पहिली डेंग्यू लस असून लसीकरणापूर्वीच्या चाचणीची आवश्यकता भासत नाही. तसेच, पूर्वी डेंग्यूचा संसर्ग झाला असो वा नसो, ती लोकांवर वापरली जाऊ शकते. ही मंजुरी भारतातील डेंग्यू प्रतिबंधाचे प्रयत्न अधिक बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असून इथे हा रोग एक मोठे सार्वजनिक आरोग्य आव्हान ठरला आहे. डेंग्यू हा डासांमुळे पसरणारा एक विषाणूजन्य आजार आहे. तो जागतिक सार्वजनिक आरोग्यासाठी एक मोठा धोका असून १२५ हून अधिक देशांमध्ये त्याचा प्रादुर्भाव आहे. जागतिक स्तरावर डेंग्यूच्या एकूण रुग्णांपैकी जवळपास एक तृतीयांश रुग्ण भारतात आहेत. नोंदवलेल्या रुग्णांची संख्या २०२५ मध्ये १,१३,००० पेक्षा जास्त होती, परंतु मॉडेलिंग विश्लेषणानुसार भारतातील डेंग्यूचा भार नोंदवलेल्या संख्येपेक्षा जास्त असल्याचे दिसते. हे दरवर्षी लाखो संसर्गांचे प्रतिनिधित्व करते.

## एससीईआरटी-कोटक एज्युकेशन फाउंडेशनचा 'एआय साथी' उपक्रम

मुंबई (दै. संध्या) :

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) आणि कोटक एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील शिक्षकांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) साक्षरता वाढवण्यासाठी 'एआय साथी फॉर एज्युकेटर्स' या अभ्यासक्रमाची घोषणा करण्यात आली. 14 जुलै रोजी मंत्रालयात शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते या अभ्यासक्रमाचे उद्घाटन झाले. इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या सुमारे 7.5 लाख शिक्षक आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांसाठी हा अभ्यासक्रम अनिवार्य असणार असून, राज्याच्या 20 तासांच्या ऑनलाइन व्यावसायिक विकास



### राज्यातील 7.5 लाख शिक्षकांना एआय प्रशिक्षण

कार्यक्रमांतर्गत चार तासांचे प्रमाणित प्रशिक्षण दिले जाणार आहे. हा अभ्यासक्रम DIKSHA प्लॅटफॉर्मवर मराठी भाषेत उपलब्ध आहे. यावेळी शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी एआय शिक्षकांच्या दैनंदिन अध्यापनातील प्रभावी सहकारी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. एससीईआरटीचे संचालक डॉ. हेमंत वासेकर यांनी एआयमुळे शिक्षकांचे कार्य अधिक परिणामकारक होईल, असे सांगितले. कोटक एज्युकेशन फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश राजा यांनी एआय हे शिक्षकांची जागा घेणारे नव्हे, तर त्यांच्या क्षमतांना बळ देणारे साधन असल्याचे स्पष्ट केले. फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी जयश्री रमेश यांनी मराठीतील हा अभ्यासक्रम शिक्षकांना आत्मविश्वासाने आणि नैतिकतेने एआयचा वापर करण्यास सक्षम करेल, असे सांगितले. तीन टप्प्यांत (बेसिक, इंटरमिजिएट आणि अॅडव्हान्स्ड) विकसित करण्यात आलेला हा अभ्यासक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 आणि युनेस्को टीचर कॉम्पिटन्सी फ्रेमवर्कशी सुसंगत असून, एआयची मूलभूत माहिती, अध्यापनातील उपयोग आणि नैतिक वापरावर विशेष भर देण्यात आला आहे.

# विद्यार्थ्यांसाठी सॅमसंगच्या 'बॅक टू स्कूल' ऑफर्स

गुरुग्राम (दै. संध्या) :

- गॅलेक्सी उपकरणांवर विशेष सवलतींचा वर्षाव
- गॅलेक्सी बुक ६ प्रो, गॅलेक्सी टॅब एस ११ अल्ट्रा, स्मार्ट मॉनिटर एम ८सह विविध उपकरणांवर विद्यार्थ्यांना खास लाभ

### गॅलेक्सी बुक ६ प्रोवर विशेष लाभ

विद्यार्थ्यांना 'गॅलेक्सी बुक ६ प्रो'च्या खरेदीवर एचडीएफसी बँकेच्या डेबिट आणि क्रेडिट कार्डद्वारे ५ हजार रुपयांपर्यंतचा लाभ मिळू शकतो. या लाभानंतर या उपकरणाची प्रभावी किंमत १ लाख ७३ हजार ९९० रुपये इतकी होते. याशिवाय विद्यार्थ्यांना १० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त विद्यार्थी सवलतीचाही लाभ मिळू शकतो.

विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिक प्रभावी आणि स्मार्ट पद्धतीने शिक्षण घेता यावे, यासाठी सॅमसंग इंडियाने आपल्या संपूर्ण गॅलेक्सी उपकरण श्रेणीसाठी 'बॅक टू स्कूल' विशेष ऑफर्सची घोषणा केली आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना गॅलेक्सी बुक ६ प्रो, गॅलेक्सी टॅब एस ११ अल्ट्रा, स्मार्ट मॉनिटर एम ८, गॅलेक्सी एस २६ मालिका, गॅलेक्सी वॉच ८ आणि गॅलेक्सी बड्स ४ मालिकेसह विविध उपकरणांच्या खरेदीवर विशेष सवलती आणि आर्थिक लाभ मिळणार आहेत.

सॅमसंगच्या 'स्टुडंट+' कार्यक्रमाच्या माध्यमातून पात्र विद्यार्थ्यांना निवडक गॅलेक्सी उपकरणांवर १० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त सवलत दिली जाणार आहे. त्याचबरोबर निवडक बँकांच्या कार्डांवर ५ हजार रुपयांपर्यंतचे लाभ, विनाव्याज मासिक हप्त्यांचे पर्याय आणि उपकरण अद्ययावत करण्यासाठी विशेष फायदे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

कंपनीने 'स्टार्ट स्कूल. स्टँड आउट. ग्रो फर्दर विथ सॅमसंग एआय' या मोहिमेअंतर्गत या विशेष ऑफर्स आणल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या संपूर्ण शैक्षणिक वर्षातील शिक्षण, सर्जनशीलता आणि उत्पादकता वाढविण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आधुनिक उपकरणे अधिक सहजपणे उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

सॅमसंगची नवीनतम गॅलेक्सी उपकरणे 'गॅलेक्सी एआय' तंत्रज्ञानाने सुसज्ज आहेत. या तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांना संवाद साधणे, सहकार्य करणे आणि आवश्यक माहिती त्वरित मिळवणे अधिक सोपे होणार आहे. 'लाइव्ह ट्रान्सलेट', 'चॅट असिस्ट' आणि गुगलच्या सहकार्याने उपलब्ध असलेले 'सर्कल टू सर्च' यांसारख्या सुविधांमुळे भाषेचे अडथळे कमी करण्यास, अभ्यासातील कार्यक्षमता वाढविण्यास आणि आवश्यक माहिती जलद शोधण्यास मदत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शिकण्याचा अनुभव अधिक सहज आणि परिणामकारक होऊ शकतो.

अद्ययावत इंटेल कोअर अल्ट्रा प्रोसेसर आणि प्रगत एनपीयूने सुसज्ज असलेला गॅलेक्सी बुक ६ प्रो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामांसाठी उपयुक्त ठरणार आहे. असाइनमेंट्स तयार करणे, सादरीकरणे बनविणे, सर्जनशील प्रकल्पांवर काम करणे तसेच एकाच वेळी विविध कामे हाताळण्यासाठी हे उपकरण उपयुक्त असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

गॅलेक्सी टॅब एस ११ अल्ट्राच्या खरेदीवरही एचडीएफसी बँकेच्या डेबिट आणि क्रेडिट कार्डद्वारे विद्यार्थ्यांना ५ हजार रुपयांपर्यंतचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे या उपकरणाची प्रभावी किंमत १ लाख १७ हजार ९९९ रुपये इतकी होते. यासोबत १० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त विद्यार्थी सवलत मिळण्याचीही सुविधा आहे.

डायनॅमिक अॅमोलेड २एक्स डिस्प्ले, सुधारित एस पेन आणि गॅलेक्सी एआयच्या विविध सुविधांनी सज्ज असलेला हा टॅब विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या नोट्स तयार करणे, कल्पनांची रेखाचित्रे काढणे, अभ्यासाचे नियोजन करणे आणि विविध शैक्षणिक प्रकल्पांवर सहकार्याने काम करण्यासाठी मदत करतो.

घरातून अभ्यास करणाऱ्या किंवा स्वतंत्र अभ्यास व्यवस्था उभारू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'स्मार्ट मॉनिटर एम ८'वरही विशेष ऑफर जाहीर करण्यात आली आहे. निवडक बँक कार्डांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ३ हजार रुपयांपर्यंतची सवलत मिळू शकते. त्यानंतर या मॉनिटरची प्रभावी किंमत ४६ हजार ६९९ रुपये होते. याशिवाय पात्र विद्यार्थ्यांना १० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त विद्यार्थी सवलतीचा लाभ मिळू शकतो.

स्मार्ट मॉनिटर एम ८मध्ये दर्जेदार दृश्य अनुभवासह आधुनिक जोडणी सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थी अभ्यास, मनोरंजन आणि इतर उत्पादक कामे एकाच उपकरणाच्या माध्यमातून करू शकतात.

## एडलवाइस लाइफचा आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ९९.३१ टक्के दावा निकाली काढण्याचा दर

पुणे (दै. संध्या) :

edelweiss life insurance

एडलवाइस लाइफ इन्शुरन्सने आर्थिक वर्ष 2026 मध्ये आजवरचा सर्वाधिक 99.31% क्लेम सेटलमेंट रेशो नोंदवला असून, सलग चौथ्या वर्षी हा रेशो 99% पेक्षा जास्त राहिला आहे. कंपनीने शून्य क्लेम प्रलंबितता देखील साध्य केली आहे, म्हणजेच आर्थिक वर्षात प्राप्त झालेला प्रत्येक क्लेम निकाली काढण्यात आला. यातून ग्राहक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या गरजेच्या क्षणी त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची विमा कंपनीची बांधीलकी पुन्हा एकदा अधोरेखित होते. क्लेम सेटलमेंट रेशो हा एकूण प्राप्त क्लेम्सपैकी दिलेल्या मृत्यू दाव्यांची टक्केवारी मोजतो आणि पॉलिसीधारकांप्रती दिलेली वचनबद्धता पाळण्याच्या विमा कंपनीच्या क्षमतेचा हा एक अत्यंत महत्त्वाचा सूचक मानला जातो. एडलवाइस लाइफ इन्शुरन्सचे एमडी आणि सीईओ सुमित राय म्हणाले, "जीवन विमा हा विश्वासावर आधारित असतो, कारण त्याचे मूल्य खरेदीनंतर अनेक वर्षांनी सिद्ध होते.

हे पॉलिसीधारकाने आपल्या प्रियजनांना दिलेल्या वचनाचे प्रतीक आहे आणि त्यांच्या आकांक्षा अबाधित राहाव्यात यासाठी हे वचन पूर्ण करणे, हा आमच्यासाठी सर्वोच्च सन्मान आहे. हा आकडा जलद, काळजीपूर्वक आणि पारदर्शक पद्धतीने खऱ्या हक्कमागण्यांची पूर्तता करण्याच्या आमच्या बांधीलकीचा प्रतिबिंब आहे."


**जेजुरी नगरपरिषद, जेजुरी**
ता. पुरंदर जि. पुणे
संपर्क: ०२११५-२५३१२३ ई-मेल- jn6396@gmail.com

जे.न.पा./जा.क्र./सा.प्र./१६७६/२०२६ दिनांक :- २०/०७/२०२६

**प्रेस नोट**

जेजुरी नगरपरीषदेकडे १) श्री. जय कोशे रा. जेजुरी यांनी टेलिफोन एक्सचेंज येथे वृक्ष जीर्ण झाला असून वृक्ष धोकादायक व पडण्याच्या स्थितीत असल्याचे नमूद असून सदर झाड पडून कधीही जीवित, वित्तहानी होण्याची शक्यता असल्याने सदर झाड पाडणेबाबत परवानगी मिळणेबाबत विनंतीअर्ज केलेला आहे. तरी याद्वारे सदर अर्ज नागरिकांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

शिक्का

सही/-
(श्री. चारुदत्त इंगुले)
मुख्याधिकारी
जेजुरी नगरपरिषद



JAIHIND COMPREHENSIVE EDUCATIONAL INSTITUTE's
**JAIHIND COLLEGE OF ENGINEERING**
G. No. 441, A/P- Kuran, Taluka - Junnar, District – Pune - 410 511.
Ph. 9960662727, 7028036201 E-mail: jcoekuran@gmail.com

FACULTY RECRUITMENT ON ADHOC BASIS FOR A.Y.2026-27

**REQUIRED**

FOR UNDERGRADUATE COURSES (UG)

| Department | Professor | Associate Professor | Assistant Professor |
|---|---|---|---|
| Artificial Inte. & Data Sci. | 1- Open to all | 1-SC,1-VJ(A), 1-Open | 1-SC,1-ST,1-VJ(A),1-NT1, 2-OBC,1-SEBC,1-EWS,3-Open |
| Civil Engg. | 1- Open to all | 1- Open to all | 1-SC,1-VJ(A),1-OBC,1-SEBC,1-Open |
| Computer Engg. | 1-SC,1-Open | 1-SC,1-VJ(A), 1-Open | 1-SC,1-ST,1-VJ(A),1-OBC 1-SEBC,1-EWS,3-Open |
| Electronics & Telecom. | 1-Open to all | 1-SC,1-VJ(A), 1-Open | 1-SC,1VJ(A),1-OBC, 1- SEBC 2- Open |
| Mechanical Engg. | 1- Open to all | 1-SC,1-VJ(A), 1-Open | 1-SC,1-VJ(A), 1-Open |
| Electronics & Com. Engg. | - | - | 1SC, 1-VJ(A), 1-Open |
| Physics | - | - | 1-SC,1-VJ(A), 1-Open |
| Chemistry | - | - | 1-SC,1-VJ(A), 1-Open |
| Mathematics | - | 1- Open to all | 1-SC,1VJ(A),1-Open |
| Electrical Engg. | - | - | 1-SC,1-Open |
| Librarian | - | - | 1- Open to all |
| Physical Director | - | - | 1- Open to all |

FOR POST GRADUATE COURSES (PG)

| Department | Professor | Associate Professor | Assistant Professor |
|---|---|---|---|
| Design Engineering (Mech.) | 1- Open to all | - | 1-Open to all |
| Signal Processing (EnTC) | - | - | 1-Open to all |
| Artifical Inte.& Data Science | 1- Open to all | - | 1-Open to all |
| Computer Engineering | 1- Open to all | - | 1- Open to all |
| VLSI Des. & Emb. Sys. (E&TC) | 1- Open to all | 1- Open to all | 1- Open to all |
| Structural Engineering | 1- Open to all | - | 1- Open to all |

PWD Reservation-Out of above posts for Assistant Professor for UG Course-01 Group A (Blind/Low vision)& 01 Group B (Hearing impaired/Hearing inpowerment)are reserved.
Out of above posts for Associate Professor for UG Course-01 Group A (Blind/Low vision)is reserved.

Qualification & experience shall be as per AICTE, DTE and Savitribai Phule Pune University norms. Application along with attested copies of all certificates should reach the college office within 15 days from the date of publication of this advertisement. Interested candidate may also email their resume. Candidate should bring all original certificates with 2 set of Xerox. The society reserve the right to reject the incomplete applications without assigning any reason. No TA/DA will be paid for attending the interview...

Mr. Jitendra Mahadev Gunjal (Chairman, JCEI) Mr. Vijay Mahadev Gunjal (Secretary, JCEI)

## थोडक्यात पण महत्वाचे...



### संकल्प इनफ्रास्ट्रक्चरतर्फे वस्तूंचे वाटप

चिखली, प्राधिकरण (दैनिक संध्या) : श्री नागेश्वर विद्यालय मोशी भागशाळा चिखली येथे गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश, वह्यांचे वाटप करण्यात आले. संकल्प इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. चे सर्वेसर्वा प्रोप्रायटर मा. संदिपजी तापकीर यांचे मार्फत ४२ गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, २०० पानी व १०० पानी वह्या यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे श्री वाल्हेकर सर माजी प्राचार्य श्री वाघेश्वर विद्यालय चऱ्होली, मा. श्री. परेश कटारिया प्रोप्रायटर, परेश टेक्सटाईन उपस्थित होते. यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना मोलाची मदत झाली. या मदतीमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद निर्माण झाला. विद्यालयाचे प्राचार्य मा. सानप सर, उपमुख्याध्यापिका मा. नाणेकर मॅडम, पर्यवेक्षिका मा. ठोंबरे मॅडम व पर्यवेक्षिका मा. पंडित मॅडम यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी श्री नागेश्वर विद्यालय मोशी भागशाळा चिखली येथील शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी , विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षिका मा. श्यामला पंडित मॅडम यांनी केले. प्रमुख पाहुणे श्री वाल्हेकर सर मा. प्राचार्य श्री वाघेश्वर विद्यालय चऱ्होली यांनी संकल्प इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि विषयी माहिती दिली. गेली अनेक वर्ष या माध्यमातून ते गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना दरवर्षी मदत करत असतात. मा. बुरुड मॅडम यांनी सूत्रसंचलन केले. मा. शेवाळे मॅडम यांनी आभार प्रदर्शन केले.




### कचरा प्रश्न पेटला : मोशी परिसरातील नगरसेवकांचा “एल्गार”

पिंपरी (दैनिक संध्या) : मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर आला असून, आता या विषयावर मोशी परिसरातील लोकप्रतिनिधींनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मोशी कचरा डेपोवर केवळ मोशी अर्थात भोसरी विधानसभा मतदारसंघातीलच कचरा टाकावा आणि पिंपरी व चिंचवड विधानसभा मतदारसंघातील कचरा येथे डंप करू नये, अशी ठाम मागणी नगरसेवक निखिल शिवाजी बोऱ्हाडे यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना दिलेल्या निवेदनात बोऱ्हाडे यांनी म्हटले आहे की, मोशी कचरा डेपोवर ८ जुलै २०२६ रोजी कचऱ्याचा डोंगर वेस्ट टू एनर्जी प्रकल्पावर कोसळून भीषण दुर्घटना घडली. या घटनेत नऊ कामगारांचा मृत्यू झाला असून, अनेक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेनंतरही शहरातील वाढत्या कचऱ्याचा भार मोशीवरच टाकण्याचा प्रयत्न होत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, १९८२ पासून शहरातील कचऱ्याची विल्हेवाट मोशी येथे लावली जात असून, आज शहराची लोकसंख्या ४० लाखांच्या घरात पोहोचली आहे. शहरात दररोज सुमारे १,५०० मेट्रिक टन कचरा निर्माण होत असून, त्यातील मोठा हिस्सा मोशी कचरा डेपोवर जमा होतो. त्यामुळे परिसरातील नागरिकांना आरोग्य, पर्यावरण आणि सुरक्षिततेच्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मोशी परिसरातील नागरिकांनी गेली अनेक दशके शहराचा कचरा सहन केला असून, आता अन्य मतदारसंघातील कचरा मोशीत आणण्याचा कोणताही निर्णय स्वीकारला जाणार नाही, असा इशारा देखील निवेदनातून देण्यात आला आहे. पिंपरी आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघांसाठी स्वतंत्र व पर्यायी कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.




### वाकड पोलिसांची मोठी कारवाई : घरफोडी करणाऱ्या सराईतासह चौघांना अटक


पिंपरी (दैनिक संध्या) : वाकड पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने उत्कर्ष चौक परिसरातील बंद फ्लॅटमध्ये झालेल्या घरफोडीचा यशस्वी छडा लावत एका सराईत गुन्हेगारासह चार जणांना अटक केली आहे. आरोपींकडून सुमारे १० लाख ३४ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून घरफोडीचे पाच गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्कर्ष चौक परिसरातील बंद फ्लॅटमध्ये चोरी झाल्यानंतर वाकड पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. या तपासादरम्यान वाकड येथील इराणी कॅफेजवळून मुख्य आरोपी अतुल उर्फ आट्या चंद्रकांत आमले याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे केलेल्या कसून चौकशीतून मोहन उर्फ आबा मुजमुले, भीमराव गंगावणे आणि रामेश्वर उपल्ले या त्याच्या साथीदारांची नावे समोर आली. त्यानंतर पोलीसांनी विविध ठिकाणी सापळा रचून तिघांनाही अटक केली. आरोपींकडून ९७.८५ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण १० लाख ३४ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे वाकड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या घरफोडीच्या पाच गुन्ह्यांची उकल झाली आहे. दरम्यान, मुख्य आरोपी अतुल उर्फ आट्या आमले हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध पिंपरी-चिंचवड, पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहिल्यानगर आणि लातूर जिल्ह्यांमध्ये एकूण ४४ गुन्हे दाखल आहेत. पोलीसांकडून आरोपींची अधिक चौकशी सुरू असून आणखी काही घरफोडीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. सदरची कारवाई ही वाकड पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अंबरीश देशमुख, श्रीनिवास दराडे, सहायक पोलीस फौजदार संदीप गवारी, पोलीस हवालदार चंदु गिरे, दिपक साबळे, विजय घाडगे, हनुमंत कांबळे, विजय भुसारे, सचिन गायकवाड, पोलीस अंमलदार ज्ञानदेव झेंडे, कौतेंय खराडे, विक्रम भगत, समाधान कांबळे, अभिषेक मांडे, प्रमोद गायके व मंगेश लोखंडे यांनी केली आहे.

## अण्णा भाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

पिंपरी (दै. संध्या)

"लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या जिद्द, प्रतिभा आणि लेखणीच्या बळावर मराठी साहित्यविश्वात अढळ स्थान निर्माण केले तर अवघ्या दीड दिवसांच्या शालेय शिक्षणानंतरही त्यांनी साहित्य, शाहिरी, पोवाडे आणि लोककलेच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे मोठे कार्य उभे करत ते साहित्यसम्राट झाले,त्यांच्या व्यापक विचारांचा वारसा सर्वांनी जोपासावा असे प्रतिपादन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस तसेच निगडी येथील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले,त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी नगरसेविका अनुराधा गोरखे, उपायुक्त आण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, माजी नगरसदस्य भगवान शिंदे, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गणेश अवघडे, जेजुरी संस्थानचे विश्वस्त अनिल सौंदडे, समरसता गतिविधिचे पश्चिम महाराष्ट्र संयोजक मुकुंदराव आफळे,विलास लांडगे,डॉ. धनंजय भिसे, सामाजिक कार्यकर्ते संदीपान झोंबाडे,भाऊसाहेब अडागळे,संजय ससाणे, सतीश भवाळ,अरूण जोगदंड, नितीन घोलप, मनोज तोरडमल,बाळासाहेब खंदारे, नाना कसबे, सुनील भिसे, युवराज दाखले, डी. पी. खंडाळे, शिवाजी साळवे, नामदेव रिटे,गीता आढागळे, उषा कांबळे, विशाल कसबे, स्वप्निल वाघमारे, राजू आवळे, गणेश साठे,कैलास पाटोळे, वैशाली जाधव, सविता दुनघव, वंदना सुकळे, शिवाजी खडसे, नंदू कारके, मनोज गायकवाड, सूरज कांबळे, विक्रम गायकवाड, अनिकेत साळवे, अंजना भालेराव, सुनिता मेंगळे, आशा बोराडे, मेघराज साळवे, महादेव आढागळे, राकेश बावणे, तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



उपमहापौर शर्मिला बाबर म्हणाल्या की,लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी वंचित, शोषित, कष्टकरी आणि उपेक्षित समाजाच्या वेदना शब्दबद्ध करत त्यांना न्याय आणि स्वाभिमानासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. 'फकीरा'सारख्या अजरामर साहित्यकृतीतून त्यांनी सामाजिक परिवर्तनाचा विचार मांडला, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाला आपल्या शाहिरीतून देश-विदेशात पोहोचविण्याचे कार्य केले. अण्णाभाऊ साठे हे केवळ एका समाजाचे नव्हे, तर सर्वांचे प्रेरणास्थान आहेत. सामाजिक समता, बंधुता, न्याय आणि मानवी मूल्यांचा त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच मार्गदर्शक असून त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे." याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी देखील आपल्या मनोगतातून अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, शाहिरी आणि समाजप्रबोधनाच्या कार्याला उजाळा देत त्यांचेविषयी कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

## पार्किंगमधील दोन ई-स्कूटर अचानक पेटल्या, महिला जखमी

पिंपरी (दै. संध्या)



चिंचवडमधील चिंचवडे नगर येथे सोमवारी सकाळी एका निवासी इमारतीच्या पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या दोन इलेक्ट्रिक दुचाकींना अचानक भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. पार्किंगमधून धुराचे लोट बाहेर पडू लागले. या दुर्घटनेत दोन्ही ई-स्कूटर, एअर कंडिशनर आणि इतर साहित्य जळून खाक झाले. सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाले असून, एक महिला किरकोळ जखमी झाली आहे.

सकाळी सुमारे सव्वासातच्या सुमारास ही घटना घडली. पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या इलेक्ट्रिक दुचाकींमधून अचानक धूर निघू लागला. त्यानंतर काही क्षणांतच दोन्ही वाहनांनी पेट घेतला. आगीच्या ज्वाळा वेगाने पसरल्याने इमारतीतील रहिवाशांमध्ये घबराट निर्माण झाली. प्राथमिक माहितीनुसार, शॉर्टसर्किट किंवा बॅटरीतील तांत्रिक बिघाडामुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, नेमके कारण तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

घटनेची माहिती मिळताच प्राधिकरण अग्निशामक केंद्र, थेरगाव अग्निशामक केंद्र आणि मुख्यालयातून असे तीन अग्निशामक बंब घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी तत्काळ पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळवले. त्यामुळे आग इमारतीत पसरली नाही आणि मोठी जीवितहानी टळली. आगीच्या धुरामुळे आणि गोंधळात एक महिला किरकोळ जखमी झाली. तिला तातडीने थेरगाव येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.

## पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना



सांगवी व दापोडी परिसरातील पाणीपुरवठा अधिक नियमित, पारदर्शक आणि वेळापत्रकानुसार करण्यासाठी महापालिकेने तातडीने उपाययोजना सुरू केल्या आहेत. वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून जलकुंभ, जलवाहिन्या आणि पाणीपुरवठा प्रक्रियेवर सातत्याने देखरेख ठेवली जात आहे. नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या असून, पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे.

**- अजय सूर्यवंशी, सह शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

पिंपरी (दै. संध्या)

सांगवी व दापोडी परिसरातील पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांनी व्यक्त केलेल्या अडचणींची पिंपरी चिंचवड महापालिकेने तातडीने दखल घेतली असून, पाणीपुरवठा अधिक नियमित, वेळापत्रकानुसार आणि सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन आवश्यक निर्देश देण्यात आले असून, पाणीपुरवठा व्यवस्थेवर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने सांगवी व दापोडी परिसरातील जलवाहिन्या, उंच जलकुंभ आणि वितरण व्यवस्थेचा आढावा घेतला आहे. पाण्याच्या टाक्यांवर नियमित कर्मचारी उपलब्ध राहतील, वितरणाचे वेळापत्रक काटेकोरपणे पाळले जाईल तसेच नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित कार्यवाही केली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

गेल्या काही दिवसांत काही भागांत पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर वितरण व्यवस्थेचे तांत्रिक परीक्षण करण्यात आले आहे. ज्या ठिकाणी आवश्यक असेल तेथे मनुष्यबळ वाढविणे, देखरेख मजबूत करणे आणि पाणीपुरवठा नियंत्रण प्रणाली अधिक सक्षम करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

याशिवाय पाण्याच्या गुणवत्तेवरही विशेष भर देण्यात आला असून, नियमित नमुना तपासणी, जलकुंभांची स्वच्छता आणि वितरण यंत्रणेवर सतत देखरेख ठेवली जात आहे. नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हे महापालिकेचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे प्रशासनाने सांगितले.

पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता महेश बरीदे यांनी सांगितले की, "सांगवी व दापोडी परिसरातील पाणीपुरवठ्याबाबत प्राप्त झालेल्या सूचनांची गांभीर्याने दखल घेण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असून, वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून नियमित आणि वेळापत्रकानुसार पाणीपुरवठा सुनिश्चित केला जाईल."

महापालिकेने नागरिकांनाही पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले असून, पाणीपुरवठ्याबाबत कोणतीही अडचण असल्यास संबंधित क्षेत्रीय कार्यालय अथवा पाणीपुरवठा विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पीएमआरडीएत मनुष्यबळाचा तुटवडा; ६१ टक्के पदे रिक्त

पिंपरी (दै. संध्या)

- विकासकामांच्या गतीवर परिणाम
- ४०७ मंजूर पदांपैकी केवळ १५७ कर्मचारी कार्यरत
- रिंग रोड, नगररचना आणि पायाभूत प्रकल्पांसाठी रिक्त पदे भरण्याची गरज

पुणे महानगर प्रदेशाचा झपाट्याने विस्तार, नव्या रस्त्यांचे जाळे, नगररचना, गृहनिर्माण प्रकल्प आणि विविध पायाभूत सुविधा उभारण्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या पीएमआरडीएला सध्या मनुष्यबळ टंचाईचा सामना करावा लागत आहे. मंजूर पदांच्या तुलनेत 61 टक्के पदे रिक्त असली, तरी उपलब्ध अधिकाऱ्यांच्या कार्यक्षम नियोजनाद्वारे कामांची गती कायम ठेवण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात आहे. अलीकडेच काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्याने कार्यरत अधिकाऱ्यांवर अतिरिक्त जबाबदाऱ्या आल्या असल्या, तरी कामावर याचा परिणाम होऊ नये यासाठी नियोजन केले जात आहे. त्यामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांची कसरत होत असल्याची माहिती समोर आली आहे. पीएमआरडीएच्या उपलब्ध माहितीनुसार, प्राधिकरणात एकूण 407 पदे मंजूर आहेत. मात्र, सध्या केवळ 157 कर्मचारी व अधिकारी कार्यरत असून, 250 पदे रिक्त आहेत. परिणामी, अनेक विभागांमध्ये एकाच अधिकाऱ्याकडे दोन किंवा अधिक विभागांचा कार्यभार देण्यात आला आहे. यामुळे फाईल मंजुरी, प्रशासकीय निर्णय, विकास आराखडे आणि विविध प्रकल्पांच्या प्रक्रियेत काही प्रमाणात वेळ लागत आहे. वर्गनिहाय आकडेवारी पाहता, वर्ग 'अ'मधील 82 मंजूर पदांपैकी 47 पदे भरलेली असून, 35 पदे रिक्त आहेत. वर्ग 'ब'मध्ये 110 पैकी केवळ 35 पदे भरलेली असून, 75 पदे रिक्त आहेत. वर्ग 'क'मध्ये 165 पदांपैकी 30 पदांवर कर्मचारी कार्यरत असून 135 पदे रिक्त आहेत. वर्ग 'ड'मध्ये 50 पैकी 45 पदे भरलेली असून, पाच पदे रिक्त आहेत. लिपिक-टंकलेखक संवर्गात 70 पदे मंजूर असताना प्रत्यक्षात दोन कर्मचारी कार्यरत असल्याने कार्यालयीन कामकाजावर सध्या ताण जाणवत आहे.




दरम्यान, या परिस्थितीत लवकरच मोठा दिलासा मिळण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेल्या 61 नव्या लिपिकांची नियुक्ती प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, सध्या त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी सुरू आहे.

## न्यायाधीश वाढले; कर्मचारी आणि सुविधांचा मात्र अजूनही दुष्काळ

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरासाठी मोरवाडी येथे सुरू करण्यात आलेले जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय शहराच्या न्यायव्यवस्थेसाठी महत्त्वाचे पाऊल ठरले असले, तरी आवश्यक मनुष्यबळ आणि मूलभूत सुविधांच्या अभावामुळे न्यायदान प्रक्रियेवर परिणाम होत असल्याचे चित्र समोर आले आहे. न्यायालयात अतिरिक्त न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात आली असली, तरी कर्मचारी, सरकारी अभियोक्ते, स्टेनोग्राफर आणि तांत्रिक सुविधांची कमतरता कायम असल्याने वकील, पक्षकार आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांना रोजच विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. २५ जानेवारी २०२६ रोजी शहरासाठी दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) आणि जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय सुरू करण्यात आले. त्यानंतर प्रकरणांचा वाढता ताण लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनने सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे एक ॲडहॉक आणि तीन पूर्णवेळ अशा अतिरिक्त नियुक्त्यांसह एकूण पाच जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश उपलब्ध झाले. मात्र, त्या प्रमाणात कर्मचारीवर्गाची नियुक्ती न झाल्याने न्यायालयीन कामकाजावर मोठा ताण पडत आहे. संपूर्ण शहरातील सर्व पोलीस ठाण्यांतील फौजदारी प्रकरणांचे कामकाज या न्यायालयांमध्ये चालते.

## भाजप प्रदेशाध्यक्ष मा. श्री. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन

पिंपरी (दै. संध्या)

- पिंपरी विधानसभेत आमदार अमित गोरखे यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर
- समाजोपयोगी उपक्रमाचे विशेष कौतुक



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी विधानसभा मतदारसंघात आमदार श्री. अमित गोरखे यांच्या मार्गदर्शनाखाली चिंचवड येथील नोवेल इंटरनॅशनल स्कूलमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र प्रदेश भाजपचे अध्यक्ष मा. श्री. रवींद्रजी चव्हाण यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

उद्घाटन प्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना मा. श्री. रवींद्रजी चव्हाण म्हणाले, “मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ औपचारिक कार्यक्रम न करता समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची संकल्पना अत्यंत प्रेरणादायी आहे. रक्तदानासारख्या उपक्रमातून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळू शकते. आमदार अमित गोरखे यांनी पिंपरी मतदारसंघात आयोजित केलेले हे रक्तदान शिबिर सामाजिक बांधिलकी जपणारे आणि तरुणांना सेवाभावाची प्रेरणा देणारे आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचतो आणि सार्वजनिक जीवनातील लोकप्रतिनिधींनी समाजहिताला प्राधान्य दिल्याचे समाधान वाटते.”

सकाळी ९.०० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर मा. श्री. रवींद्रजी चव्हाण यांनी रक्तदात्यांशी संवाद साधत त्यांच्या उत्साहाचे कौतुक केले आणि अधिकाधिक नागरिकांनी रक्तदान चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

या प्रसंगी भाजप प्रदेश महामंत्री मा. श्री. राजेशजी पांडे, भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार मा. श्री. निरंजन डावखरे, आमदार मा. श्री. शंकर जगताप, आमदार श्रीमती उमाताई खापरे, उपमहापौर सौ शर्मिला बाबर, मा. श्री. राजेश पिल्ले, सभापती श्री. संजय नाना काटे, सभापती श्री. कैलास कुटे, नगरसेवक श्री. तुषार हिंगे, नगरसेवक श्री. शीतल शिंदे, नगरसेवक श्री. कुशाग्र कदम, नगरसेविका श्रीमती अनुराधा गोरखे, नगरसेविका सौ. सुप्रिया चांदगुडे, नगरसेविका सौ. शैलजा मोरे, नगरसेविका सौ. मधुरा शिंदे, श्री. प्रसाद शेट्टी, श्री. अमित बाबर, श्री. नेताजी शिंदे तसेच पिंपरी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार अमित गोरखे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले हे भव्य रक्तदान शिबिर सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उत्साहात पार पडले. शिबिराला नागरिकांचा, विशेषतः युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून सुमारे ३०२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. मोठ्या प्रमाणात झालेल्या सहभागामुळे हे शिबिर पिंपरी-चिंचवड शहरातील उल्लेखनीय आणि भव्य रक्तदान उपक्रमांपैकी एक ठरत असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

यावेळी आमदार अमित गोरखे यांनी मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी विधानसभा मतदारसंघातील ७ प्रभागांमध्ये अशाच प्रकारे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले,तसेच नगरसेविका श्रीमती अनुराधाताई गोरखे यांनी सर्व रक्तदाते, स्वयंसेवक आणि आयोजनासाठी परिश्रम घेतलेल्या कार्यकर्त्यांचे आभार मानत, समाजहितासाठी अशा उपक्रमांची परंपरा पुढेही सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वारकऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर व खाद्यपदार्थांचे वाटप

बारामती (दैनिक संध्या) : संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यानिमित्त शिवसेना शिंदे गट-शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व शिवसेना डॉक्टर सेल यांच्यावतीने वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर तसेच ५००० हजार पाणीबॉटल, पिठले-भाकरी,फळे व खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले.तपासणी झालेल्या वारकऱ्यांसाठी औषधांचे वाटपही मोठ्या प्रमाणात करण्यात आले.यावेळी शिवसेना डॉक्टर सेलचे लोकसभा बारामती अध्यक्ष डॉ.केशव जायभाय सर,शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष पुणे जिल्हाप्रमुख मंगेशराव खताळ,शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महिला आघाडी शशिकला काळे,शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुनीता डोंबाळे, युवा सेना विधानसभा प्रमुख हनुमंत देवकाते,शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे तालुकाध्यक्ष अनिल कदम,शहराध्यक्ष कृष्णमुर्ती जगताप, आरोग्य सहाय्यक हसिना डांगे,संतोष गोलांडे,डॉ.मेहता,चेतन देवकाते,डॉ.स्वप्रिल खोमणे तसेच प्रसिद्ध अर्थतज्ञ डॉ.माने, मोहसीन शेख व शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

### खाजगी संवर्गातील दुचाकी वाहनांसाठी एमएच 42 बी वाय क्रमांकाची नवीन मालिका

बारामती (दैनिक संध्या) : खाजगी दुचाकी संवर्गातील वाहनांसाठी बारामती उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे "एमएच 42 बी वाय" क्रमांकाची नवीन मालिका सुरु करण्यात येणार असून आकर्षक क्रमांक राखून ठेवण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ज्या खाजगी चारचाकी वाहनांसाठी तिप्पट रक्कम भरुन आकर्षक तसेच पसंतीचा क्रमांक हवा असेल त्यांनी 22 जुलै रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 03.00 वाजेच्यादरम्यान धनाकर्षासह (डी.डी.) विहित नमुन्यात अर्ज करावा. एकाच क्रमांकाकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी 22 जुलै रोजी सायं 04.30 वाजता कार्यालयीन सूचना फलकावर लावण्यात येईल. यादीतील अर्जदारांना लिलावासाठी जास्त रकमेचा डी.डी. जमा करावयाचा असेल त्यांनी 23 जुलै रोजी दुपारी 3.30 वाजेपर्यंत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा. त्याच दिवशी दुपारी 04.00वाजता संबंधित अर्जदारांसमोर लिफाफे उघडून विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रक्कमेचा धनाकर्ष भरलेल्या व्यक्तीस नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाणार आहे. 23 जुलै रोजी केवळ खाजगी दुचाकी संवर्गातील वाहनांकरिता आकर्षक तसेच पसंती क्रमाकांचे विहित शुल्कासह अर्ज सकाळी 10.30 ते दुपारी 03.00 वाजेपर्यंत स्वीकारले जाईल. एकाच क्रमांकाकरीता अधिक अर्ज आल्यास त्यांची यादी 24 जुलै रोजी सकाळी 10.30 वाजता कार्यालयीन सूचना फलकावर लावण्यात येईल. यादीतील अर्जदारांना लिलावासाठी जास्त रकमेचा डीडी 24 जुलै रोजी दुपारी 3.30 वाजेपर्यंत जमा करता येईल. त्याच दिवशी दुपारी 4.00 वाजता सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात उपस्थित पात्र व्यक्तीसमोर लिफाफे उघडून विनिर्दीष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केलेल्या अर्जदारास नमूद पसंती क्रमांक वितरित केला जाईल. अर्जासोबत पत्त्याचा पुरावा, छायाचित्र ओळखपत्र तसेच पॅनकार्डची स्वाक्षांकित प्रत आणि "DY RTO, BARAMATI" या नावाने राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित बँकेचा बारामती येथील धनाकर्ष असावा. एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेले शुल्क परत करता येणार नसल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यानी कळविले आहे.



### गरजू 20 विद्यार्थ्यांना इनरव्हिल क्लब ऑफ पुणे प्लॅटिनमकडून गणवेश वाटप

पुणे (दैनिक संध्या) : सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने इनरव्हिल क्लब ऑफ पुणे प्लॅटिनम यांच्या वतीने गरजू २० विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला, तर पालकांनीही क्लबच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना नवीन गणवेश प्रदान करण्यात आले. यावेळी क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण हेच उज्वल भविष्य घडविण्याचे प्रभावी साधन असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, जिद्द आणि सातत्यपूर्ण परिश्रमाच्या जोरावर यश संपादन करावे, असा संदेश दिला. इनरव्हिल क्लब ऑफ पुणे प्लॅटिनमकडून शिक्षण, आरोग्य आणि महिला सक्षमीकरण यांसारख्या विविध सामाजिक क्षेत्रांत सातत्याने उपक्रम राबविले जात असून, गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याचा हा उपक्रम त्याच सामाजिक जाणिवेचा एक भाग असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमास क्लबच्या डिस्ट्रिक्स चेअरमन डॉ . दिपशिका पाठक , नुतन प्रेसिटंट मीना राठोड , सेक्रेटरी पुजा माळूंजकर, क्लबच्या अध्यक्षा कल्पना बोरा खजिनदार माधुरी बोरा, स्वाती हिरवे विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पवार यांनी यावेळी धनादेश स्विकारला.



### चाकणला संग्रामदुर्ग किल्ल्यात बाल दिंडीचे आगमन

चाकण (दैनिक संध्या) : ज्ञानोबा तुकोबाचा जयघोष करत, टाळ मृदुंगाच्या गजरात चाकण येथील संग्राम दुर्ग किल्ल्यात बाल दिंडीचे आगमन झाले. किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके व विद्या झिंजुरके यांनी बालदिंडीचे स्वागत केले. सेवानिवृत्त शिक्षक राजू दीक्षित, राहुल वाडेकर, किशोर झिजुंरके, भानुदास डोंगरे आदींच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. चिमुकल्यांनी वारकऱ्यांचा वेष परिधान करून रिंगण तयार केले होते. बालकांनी कपाळी केशरी गंध, हातात टाळ, मृदंग, वीणा घेऊन या उपक्रमाची शोभा वाढवली होती. विद्या झिंजुरके यांनी स्वागत केले.



# NEET परीक्षेत घवघवीत यश!

- देशात मुलींमध्ये पहिली आलेल्या श्रावणी कुदळेसह गुणवंत विद्यार्थ्यांचा रोटरी क्लबकडून विशेष सन्मान

**भिगवण (दै. संध्या)**

राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षेत (NEET) उज्ज्वल यश संपादन करून आपल्या परिसराचे नाव देशभर उज्ज्वल करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा रोटरी क्लबच्या वतीने नुकताच अत्यंत दिमाखदार सोहळ्यात सत्कार करण्यात आला. यामध्ये देशात मुलींच्या श्रेणीत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या श्रावणी कुदळे हिचा विशेष सन्मानचिन्ह, आणि शाल-श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.याच सोहळ्यात NEET परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवून यश संपादन करणाऱ्या अनुश्री थोरात, प्रणव टेंभुर्णे आणि समर्थ खनावरे या विद्यार्थ्यांचाही रोटरी क्लबच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि.प सदस्य मेघनाताई बंडगर व प्रमुख पाहुणे म्हणून भिगवणचे माजी सरपंच बापूराव थोरात उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रोटरी क्लबचे सचिव डॉक्टर प्रशांत चवरे यांनी सांगितले की, "NEET सारख्या अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक परीक्षेत देशात अव्वल येणे ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. श्रावणीने व इतर विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे केवळ तिच्या कुटुंबासाठीच नाही, तर संपूर्ण शहरासाठी व राज्यासाठी प्रेरणादायी आहे. तसेच अनुश्री, प्रणव आणि समर्थ यांनी मिळवलेले यश हे त्यांच्या अथक परिश्रमाचे फळ आहे."

सत्कारमूर्ती श्रावणी कुदळे हिने आपल्या मनोगतात सांगितले की, "हे यश मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा अत्यंत महत्त्वाचा ठरला. तसेच जेवढे होता येईल तेवढे मोबाईल पासून दूर राहिल्यामुळे हे यश मिळाल्याचे सर्व विद्यार्थ्यांनी सांगितले. रोटरी क्लबने केलेला हा सन्मान माझ्या पुढील वैद्यकीय प्रवासासाठी मोठी ऊर्जा देणारा आहे."

या सत्कार सोहळ्यास रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रवीण वाघ, संजय चौधरी, रियाज शेख, संपत बंडगर,औदुंबर हुलगे,अल्ताफ शेख, संजय खाडे, नामदेव कुदळे, कमलेश गांधी,केशव भापकर, योगेश चव्हाण, प्रसाद पाटील व वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर, शहरातील मान्यवर नागरिक, गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक आणि रोटरी क्लब मधील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार सचिन बोगावत यांनी मानले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत, त्यांच्या भावी वैद्यकीय शिक्षण व सेवेच्या प्रवासासाठी मनापासून शुभेच्छा दिल्या.

## रोटरी क्लब नारायणगावच्यावतीने नारायणगावात रेनकोटचे वाटप

**नारायणगाव (दै. संध्या)**



जुन्नर तालुक्यातील रोटरी क्लब नारायणगावच्या वतीने नारायणगाव व वारूळवाडी ग्रामपंचायतचे सर्व सफाई कर्मचारी तसेच नारायणगाव परिसरातील सर्व वृत्तपत्र वितरक यांना रेनकोटचे वाटप करण्यात आल्याची माहिती क्लबचे अध्यक्ष अमित बेनके व फर्स्ट लेडी धनश्री बेनके यांनी दिली. कार्यक्रमाच्या निमित्ताने रोटरी क्लब नारायणगावचे अध्यक्ष अमित बेनके,नारायणगावचे उपसरपंच व शिवसेना तालुकाप्रमुख योगेश ऊर्फ बाबुभाऊ पाटे,विघ्नहर साखर कारखान्याचे संचालक व भाजप तालुकाध्यक्ष संतोषनाना खैरे,वारूळवाडीचे सरपंच विनायकभाऊ भुजबळ,ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटे,ह.भ.प.प्रभाकर महाराज फुलसुंदर व अनेक ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'एसटी'चे जातप्रमाणपत्र भोवले, चंद्रपूरची 'मुख्यसेविका' बडतर्फ!

**भिवंडी (दै. संध्या)**

> "शासनाची फसवणूक करुन आदिवासी समाजाची राखीव जागा बळकावल्यामुळे फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत.तसेच कायद्यातील तरतुदीनुसार आजपर्यंत घेतलेले सर्व लाभ जमीन महसूलाच्या थकबाकी प्रमाणे वसूल करुन शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात यावेत."
> **- सुनील झळके,कार्याध्यक्ष ट्रायबल फोरम, कोकण विभाग**

एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्तालय अंतर्गत चंद्रपूर येथे मुख्यसेविका म्हणून कार्यरत असलेल्या सीमा सुनील कोळी यांचे 'कोळी महादेव' या अनुसूचित जमातीचे जातप्रमाणपत्र रद्द व जप्त झाल्यामुळे आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना मुंबई यांनी त्यांना सेवेतून बडतर्फ केले आहे. मुख्यसेविका पदाच्या निवड यादीमध्ये अनुसूचित जमाती सर्वसाधारण या प्रवर्गात त्यांची निवड झाली आहे.त्या अनुसूचित जमाती प्रवर्गात मोडत असल्याने केलेल्या दाव्यानुसार त्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास आयुक्त कार्यालयाने वारंवार सुचित केले होते. त्यांनी जातवैधता प्रमाणपत्र सहा महिण्याच्या कालावधीत सादर करण्याच्या अटींवर नियुक्ती मिळण्यासाठी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई येथे याचिका दाखल केली होती. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार त्यांना तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आली होती. त्यांचे 'कोळी महादेव' जमातीचे प्रमाणपत्र पुणे समितीने रद्द करुन जप्त केले. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागेवर सेवा प्राप्त केली असल्याने त्यांच्याविरुद्ध अधिनियम २००० च्या कलम १० ते १२ मधील विहित तरतुदी अन्वये कारवाई करुन अनुपालन अहवाल समितीस सादर करण्याचे निर्देश आयुक्त बाल विकास सेवा योजना यांना देण्यात आले होते.त्यानुसार आयुक्त बाल विकास सेवा योजना यांनी सिमा कोळी यांना सेवेतून कार्यमुक्त केले आहे.

## आयडियल बुध्दिबळ : मुंबईच्या सर्वा व पुण्याच्या समीरा यांना दुहेरी विजेतेपद

**मुंबई (दै. संध्या)**




आंतरराष्ट्रीय बुध्दिबळ दिनानिमित्त आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी-ग्रुपतर्फे दि न्यू इंडिया ॲशुरन्स कंपनी लिमिटेड सहप्रायोजित १४ वर्षाखालील विविध ६ वयोगटाच्या राज्य स्तरीय बुध्दिबळ स्पर्धेत मुंबईची सर्वा परेलकर व पुण्याची समीरा थोरात यांनी दुहेरी विजेतेपद पटकाविले. आंतरराष्ट्रीय फिडे गुणांकित सबज्युनियर बुध्दिबळपटू सर्वा परेलकरने ११ व १२ वर्षाखालील तर समीरा थोरातने ८ व ९ वर्षाखालील मुलींच्या दोन वयोगटात विजेतेपद पटकावून विशेष पुरस्कार जिंकला. विजेत्या-उपविजेत्यांना पुरस्काराचे वितरण आरएमएमएसचे पदाधिकारी गोविंदराव मोहिते, निवृत्ती देसाई, अण्णा शिर्सेकर, विलास डांगे, बुध्दिबळ संघटनेचे सेक्रेटरी राजाबाबू गजेंगी, क्रीडाप्रेमी दत्ता गोळे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

मुंबई बुध्दिबळ संघटना व आरएमएमएस सहकार्याने झालेल्या न्यू इंडिया ॲशुरन्स-आयडियल जलद बुध्दिबळ स्पर्धेमध्ये मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, पुणे आदी जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय फिडे गुणांकित सबज्युनियर बुध्दिबळपटूसह एकूण ९२ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. ९ वर्षाखालील गटात मुलींमध्ये समीरा थोरातने प्रथम (३ गुण), विधी येसणेने द्वितीय (२ गुण) व मुलांमध्ये अथर्व मुळीकने प्रथम (४ गुण), स्मित लोकेने द्वितीय (४ गुण), जीतेज गाडगेने तृतीय (४ गुण); ११ वर्षाखालील गटात मुलींमध्ये सर्वा परेलकरने प्रथम (४ गुण), मृण्मयी डावरेने द्वितीय (४ गुण), स्वरा मोरेने तृतीय (२.५ गुण) व मुलांमध्ये मेहान शाहने प्रथम (४.५ गुण), सुजय सावंतने द्वितीय (४ गुण), पराव जोशीने तृतीय (३.५ गुण) तर १४ वर्षाखालील गटात मुलींमध्ये देविका पिंगेने प्रथम (३ गुण), विप्रा दांडेकरने द्वितीय (२ गुण) व मुलांमध्ये अर्णव पोर्लेकरने प्रथम (४.५ गुण), दीप फुणगेने द्वितीय (४ गुण), स्वयम दळवीने तृतीय (४ गुण) क्रमांक पटकाविला.

## "राजे ग्रुप महाराष्ट्र राज्य"च्या पाठपुराव्याला यश

**नारायणगाव (दै. संध्या)**



"राजे ग्रुप महाराष्ट्र राज्य"कडे NCMC स्मार्ट कार्ड काढण्यासाठी काही एजन्सी/एजंट शासकीय निर्धारित शुल्कापेक्षा जादा पैसे आकारत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत राजे ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांनी नारायणगाव आगार प्रमुख श्री. वसंत अरगडे यांना लेखी निवेदन देऊन संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती. या निवेदनाची दखल घेत आगार प्रमुखांनी संबंधित एजन्सींना शासकीय नियमांचे पालन करण्याच्या सूचना दिल्या. मात्र, त्यानंतर आळेफाटा येथील एका एजन्सीविरोधात पुन्हा लेखी तक्रार प्राप्त झाली. संबंधित एजन्सीकडून शासकीय शुल्क ₹१९९ असताना तब्बल ₹३०० आकारले जात असल्याचे निदर्शनास आले. विशेष म्हणजे, ७५ वर्षीय ज्येष्ठ महिलेकडून ₹३०० शुल्क मागण्यात आल्याने त्या स्मार्ट कार्ड काढण्यासाठी नारायणगाव येथे आल्या होत्या. हा प्रकार समोर आल्यानंतर राजे ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांनी व तक्रारदारांनी संपूर्ण घटनेचे व्हिडिओ चित्रीकरण केले.

## पुरोगामी विद्यालयातील मुलांना लष्करी सेवेतील संधींबाबत मार्गदर्शन

**हवेली (दै. संध्या)**



भारत मातेची सेवा करण्याची, आपली हिम्मत, जज्बा, क्षमता सिद्ध करण्याची संधी फक्त लष्करात पुर्ण होते.शिवाय आपल्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य प्राप्त करणे,जीवनाला शिस्तबद्ध आकार देणे यासाठी विद्यार्थ्यांनी लष्करात भरती होण्याचे आवाहन नायब सुभेदार आनंद सिंग, हवालदार गोविंद, नायक विजय साहेब, यांनी केले.लष्करात भरती होण्यासाठी ग्रामीण मुलांमध्ये प्रचंड उर्जा असते फक्त दिशा देण्याची गरज आहे.आर्मी,नेव्ही, किंवा एअर फोर्स मध्ये दहावी,आयटीआय किंवा कोणताही डिप्लोमा, इंजिनियर शाखेतून तसेच सतरा वयापासून ते बावीस वर्षांपर्यंत भरती होता येते फक्त मेहनत करण्याची तयारी ठेवा असे सांगितले यानिमित्त विद्यार्थ्यांना लष्करी टोप्या, रोजनिशी,पेन माहिती पत्रिका,व पोस्टर तसेच शिक्षकांना रोजनिशी चे वाटप केले. झोनल आर्मी रिक्रुटिंग ऑफिस पुणे यांच्या वतीने व विद्यालयाचे माजी विद्यार्थी माजी सैनिक रवींद्र चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.विद्यालयाचे पर्यवेक्षक राजीव चव्हाण यांनी पाहुण्यांचे स्वागत केले तर सविता देवकर, वंदना चौधरी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.या कार्यक्रमात विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

## खारपाले शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याची भेट

**गडब (दै. संध्या)**



खारपाले, ता. पेण येथील अति दुर्गम भागातील शाळेत ॲन्टीपायरसी सेल चे मुख्य तपासी अधिकारी राम जित (जितू) गुप्ता यांच्या संकल्पनेतून खारपाले येथील शाळेतील मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. जितू गुप्ता सर तळागाळातील गरीब गरजू सर्व सामान्य व्यक्तींना नेहमीच मदत करत असतात, महाराष्ट्र विविध ठिकाणी जितू गुप्ता सर यांचे सामाजउपयोगी उपक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाले आहेत. रामजित(जितू) गुप्ता यांनी रायगड जिल्ह्यातील खारपाले गावातील जि.प.प्राथमिक शाळेला भेट देऊन सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य प्रदान करुन सत्कार केला.दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. पुढील वर्षी सर्वात जास्त गुण संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सायकल भेट देण्याचे आश्वासन दिले आहे.सर्व प्रथम शाळेतील मुलांनी इशस्तवन सादर करुन मोठ्या उत्साहात स्वागत केले. गुप्ता सरांच्या या संकल्पनेतून मुलांमध्ये अभ्यासू वृत्ती निर्माण होऊन ते अधिक गतिमान जीवन घडवून आपापल्या कला कौशल्यांना वाव देण्यासाठी प्रयत्न करतील व त्यांना लागणाऱ्या यापुढे कोणत्याही प्रकारच्या गरजू शैक्षणिक वस्तू देण्याचे ठरविले आहे.तसेच शाळेतील सभागृहासाठी त्वरित चार फॅन देण्याचे कबूल केले. खारपाले येथील या प्राथमिक शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर,समाजसेविका राजकुमारी रामजित गुप्ता, समाजसेवक उत्तम भिकाजी बंगाले,समाजसेविका मनीषा गोडसे, कुसुम चोबे, राजेश कोठेकर, अनंत चवरकर, रायगड शानच्या संपादिका अवंतिका म्हात्रे, सरपंच कविता गावंड, उपसरपंच पांडुरंग तुरे, सदस्य सुवर्णा कडू, महादेव चायाभोईर हे उपस्थित होते.या सर्व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच याप्रसंगी समाजसेविका सौ.शैला प्रमोद तुरे यांना इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शनच्या वतीने "रायगड कन्या"पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला खारपाले गावातील शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मुख्याध्यापक मोकल सर यांनी केले.शेवटी सौ.शैला तुरे यांच्या निवासस्थानी सुग्रास भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## उपक्रमशील शिक्षक, गुणवंत विद्यार्थी व सेवानिवृत्त मुख्याध्यापकांचा भव्य गौरव सोहळा उत्साहात संपन्न

**दौंड (दै. संध्या)**



दौंड तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, रोटरी क्लब ऑफ दौंड आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) यांच्या संयुक्त विद्यमाने दौंड तालुक्यातील उपक्रमशील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, प्रत्येक शाळेतील इयत्ता दहावी व बारावीमध्ये प्रथम क्रमांक मिळविणारे गुणवंत विद्यार्थी तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापकांचा भव्य गौरव सोहळा अष्टविनायक मंगल कार्यालय, दौंड येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस निरीक्षक पांडुरंग बुरुंगे हे होते. यावेळी नीट (NEET) परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम आणि देशात पाचवा क्रमांक मिळवून दौंड तालुक्याचे नाव देशपातळीवर उज्ज्वल करणारी कु. श्रावणी कुदळे हिचा विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी तिच्या उल्लेखनीय यशाचे कौतुक करत भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड, संपादक रामचंद्र नातू, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे माजी सचिव आदिनाथ थोरात, रोटरी क्लब ऑफ दौंडचे संचालक रो. सुनील ढगे, रो. डॉ. संजय इंगळे, रो. हरिभाऊ ठोंबरे, रो. प्रज्ञा राजोपाध्ये, रो. मोहिनी सुरवसे यांच्यासह शिक्षण, सामाजिक व विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी रोटरी क्लब ऑफ दौंडच्या अध्यक्षा रो. पायल भंडारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. दौंड तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष अशोक भुजबळ व रोटरी क्लब ऑफ दौंडचे सचिव महेश दरेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून या गौरव सोहळ्यामागील उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन मुख्याध्यापक संघाचे सचिव उत्तम जावळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कार्याध्यक्ष सुरेश वाघमोडे यांनी मानले.

गौरव सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) चे उल्हास मिसाळ, नितीन साळवे, शहीद जवान हायस्कूलच्या मुख्याध्यापिका शुभांगी मोरे तसेच त्यांच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमाबद्दल उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त करत, अशा प्रकारचे गौरव सोहळे शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे असून समाजात गुणवत्तापूर्ण शिक्षणाची प्रेरणा निर्माण करणारे असल्याचे मत व्यक्त केले.






दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# थोडक्यात पण महत्वाचे

## विनानिविदा प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

मुंबई (दैनिक संध्या) : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई शहर कार्यालयामार्फत कार्यालयाकडे प्राप्त होणारी १० लाख रूपयापर्यंतची विनानिविदा कामे बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना कामवाटप समितीमार्फत वितरित करण्यात येतात. २०२६-२७ या आर्थिक वर्षात प्राप्त होणाऱ्या कामांच्या वाटपासाठी मुंबई शहर जिल्ह्यात कार्यरत व नोंदणीकृत बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. इच्छुक संस्थांनी संस्थेच्या लेटरहेडवर प्रस्तावासोबत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, सर्व सभासदांची अद्ययावत यादी, २०२३-२४ ते २०२५-२६ या आर्थिक वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल तसेच इतर आवश्यक कागदपत्रे जोडून ३१ जुलै, २०२६ पर्यंत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई शहर येथे प्रस्ताव सादर करावेत. याबाबत अधिक माहितीसाठी इच्छुक संस्थांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई शहर कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त सुनील पवार यांनी केले आहे.

## वार्षिक विवरणपत्र सेवार्थवर उपलब्ध

मुंबई (दैनिक संध्या) : महालेखाकार (लेखा व हक्क)-२, महाराष्ट्र, नागपूर कार्यालयाने महाराष्ट्र शासनाच्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी (जीपीएफ) लेख्यांचे २०२५-२६ चे वार्षिक विवरणपत्र सेवार्थ प्रणालीवर उपलब्ध करून दिले असून, संबंधित कर्मचाऱ्यांनी आपल्या खात्याची माहिती काळजीपूर्वक तपासून आवश्यक त्रुटींची तत्काळ दुरुस्ती करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी लेखे प्रधान महालेखाकार (लेखा व हक्क)-२, नागपूर कार्यालयाकडे आहेत, त्यांना सेवार्थ पोर्टलवर वार्षिक विवरणपत्र पाहता, डाउनलोड करता व प्रिंट काढता येणार आहे. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांनी वेळेत माहितीची पडताळणी केल्यास निवृत्तीच्या वेळी निधी मंजुरीतील अनावश्यक विलंब टाळता येणार आहे. महालेखाकार कार्यालय, नागपूर यांच्या कार्यालयात ज्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे लेखे ठेवले जात आहेत अशा कर्मचाऱ्यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक सेवार्थमध्ये अद्ययावत करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. जीपीएफशी संबंधित ओटीपी आणि अन्य महत्त्वाचे संदेश नोंदणीकृत मोबाईलवरच पाठविण्यात येणार असल्याने ज्यांचा मोबाईल क्रमांक अद्याप नोंदणीकृत नाही, त्यांनी आवश्यक तपशीलासह कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच वार्षिक विवरणपत्रातील नाव, जन्मतारीख आणि इतर वैयक्तिक माहिती अचूक असल्याची खात्री करून घ्यावी. कोणतीही तफावत आढळल्यास संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांच्या माध्यमातून सेवार्थ आयडीसह आवश्यक कागदपत्रे पाठवून दुरुस्ती करून घ्यावीत.

## जिल्हा नियोजन निधीतून ४५ कोटींचा निधी मंजूर

मुंबई (दैनिक संध्या) : मुंबई उपनगराच्या भांडूप येथील महत्त्वाकांक्षी भांडूप पक्षी उद्यान प्रकल्पाच्या उभारणीला गती मिळाली असून, पर्यावरण संवर्धन, जैवविविधता संरक्षण आणि शाश्वत पर्यटनाला चालना देणारा हा प्रकल्प मुंबईसाठी महत्त्वाचा ठरणार आहे, यासाठी जिल्हा नियोजन निधीतून ४५ कोटी रुपयांचा निधी देण्यात येत असल्याची माहिती, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिली. मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड.शेलार यांनी भांडूप पक्षी उद्यान प्रकल्पाची पाहणी केली. त्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. यावेळी त्यांच्या सोबत स्थानिक आमदार मिहीर कोटेचा, नगरसेवक प्रकाश गंगाधरे, नगरसेविका हेतल गाला मोरवेकर, दीपिका घाग आणि अधिकारी उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या रामसर स्थळ म्हणून घोषित करण्यात आलेल्या ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य क्षेत्रात हा प्रकल्प प्रस्तावित असून, भांडूप पंपिंग स्टेशनलगत ठाणे खाडीच्या किनारी सुमारे २०.०९ हेक्टर क्षेत्रात त्याची उभारणी करण्यात येणार आहे. यापैकी केवळ ०.३५ हेक्टर क्षेत्रामध्ये पर्यावरणपूरक व कमी हस्तक्षेपाच्या तत्त्वावर पर्यटन सुविधा विकसित करण्यात येणार आहेत.

# महाराष्ट्राच्या यात्रेकरूंना मिळणार कायमस्वरूपी निवास सुविधा

- सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट
- मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेतील प्रत्येक लाभार्थ्याला सन्मानपूर्वक आणि सुखकर यात्रा देण्याचा शासनाचा संकल्प
- दादरहून बोधगयाकडे विशेष तीर्थदर्शन रेल्वे रवाना

■ मुंबई (दै. संध्या)

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना ही केवळ तीर्थयात्रा नसून ज्येष्ठ नागरिकांचे आयुष्यभराचे स्वप्न पूर्ण करणारी योजना आहे. प्रत्येक लाभार्थ्याला सन्मानपूर्वक, सुरक्षित आणि सुखकर प्रवासाचा अनुभव देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. बोधगया येथे दर्शनासाठी जाणाऱ्या महाराष्ट्रातील यात्रेकरूंना भविष्यात कायमस्वरूपी आणि दर्जेदार निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, त्यासाठी तेथे १० एकर जागा उपलब्ध करून घेण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली.



मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेअंतर्गत बोधगया येथे जाणाऱ्या विशेष तीर्थदर्शन रेल्वेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. मंत्री संजय शिरसाट व मान्यवरांच्या हस्ते बोधगया येथे भाविकांना घेऊन जाणाऱ्या विशेष रेल्वेला दादर रेल्वे स्थानकावरून हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले. यावेळी आमदार कालिदास कोळंबकर, आमदार मनीषा कायंदे, आमदार तुकाराम काते, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, तसेच समाजकल्याण विभागाचे मुंबई विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाळासाहेब सोळंकी आदी मान्यवर उपस्थित होते.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले, बोधगयाला दरवर्षी मोठ्या संख्येने महाराष्ट्रातील भाविक आणि यात्रेकरू भेट देतात. त्यांना निवासासाठी कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी तेथे कायमस्वरूपी सुविधा उभारण्याचा शासनाचा मानस आहे. बोधगया येथे महाराष्ट्रातील यात्रेकरूंसाठी कायमस्वरूपी निवासाची सुविधा उभारण्याच्या दृष्टीने जागा उपलब्ध करून घेण्याबाबत शासन सकारात्मक पावले उचलत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

अनेक ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक किंवा कौटुंबिक कारणांमुळे आयुष्यात कधीच बोधगयाला जाण्याची संधी मिळाली नव्हती. मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेमुळे त्यांचे हे स्वप्न पूर्ण होत असून, ही बाब शासनासाठीही समाधानाची आहे. यात्रेदरम्यान सर्वांनी परस्पर सहकार्य, बंधुभाव आणि शिस्त राखावी, गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करावे आणि ही सहा दिवसांची यात्रा आनंदाने व चिंतामुक्त वातावरणात अनुभवावी. या यात्रेदरम्यान प्रत्येक लाभार्थ्यास आरक्षित आसन, दर्जेदार भोजन, नाश्ता, वैद्यकीय सुविधा, निवास व्यवस्था तसेच अधिकाऱ्यांचे सतत मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले आहे. यात्रेदरम्यान कोणालाही कोणताही त्रास होऊ नये, यासाठी प्रशासनाला स्पष्ट सूचना देण्यात आल्या असून आवश्यक असल्यास लाभार्थ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असेही मंत्री संजय शिरसाट यांनी यावेळी सांगितले. यावेळी आमदार कालिदास कोळंबकर, आमदार मनीषा कायंदे, आमदार तुकाराम काते, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

राज्यातील नागरिकांना देशातील ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या तीर्थस्थळांचे दर्शन घडवून आणणे, तसेच समाजातील विविध घटकांना अध्यात्म, सांस्कृतिक वारसा आणि राष्ट्रीय एकात्मतेची अनुभूती देणे, हा मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा प्रमुख उद्देश आहे. या विशेष तीर्थयात्रेत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांतील ८०० पात्र लाभार्थी सहभागी झाले आहेत. २० जुलै ते २६ जुलै २०२६ या कालावधीत या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष रेल्वे प्रवासादरम्यान लाभार्थ्यांना प्रवास, नाश्ता, भोजन, निवास, वैद्यकीय सुविधा तसेच इतर आवश्यक सोयी-सुविधा शासनामार्फत पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रादेशिक उपायुक्त बाळासाहेब सोळंकी यांनी केले तर आभार सहाय्यक आयुक्त प्रसाद खैरनार यांनी मानले.

# चंद्रपूर, यवतमाळमधील प्रदूषणावरील उपाययोजनांच्या कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करा

■ मुंबई (दै. संध्या)

चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील कोळसा खाणी व कोल वॉशरीजमुळे हवेची व पाण्याची गुणवत्ता घसरून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी अल्प, मध्यम आणि दीर्घकालीन उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. केवळ चर्चेवर भर न देता, प्रत्यक्ष कृतीसाठी तीन टप्प्यांत कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.



चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रांत कार्यरत असलेल्या उद्योगपतींच्या शिष्टमंडळासोबत कोल वॉशरीज तसेच कोळसा खाणींमुळे होणाऱ्या प्रदूषणासंदर्भात मंत्री मुंडे यांनी मुंबईत बैठक घेतली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रदूषणाची सद्यःस्थिती, प्रदूषण होण्याची प्रमुख कारणे आणि त्यावर करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत सादरीकरण करण्यात आले. यावेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार यांच्यासह चंद्रपूर व यवतमाळमधील कोळणा खाण व कोल वॉशरीज कंपन्यांचे अधिकारी, प्रतिनिधी तसेच चंद्रपूर विभागाचे विभाग समन्वयक डॉ विश्वजीत ठाकूर, प्र. वैज्ञानिक अधिकारी व इतर प्रदुषण नियंत्रण मंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

चंद्रपूर परिसरातील प्रदूषण जास्तीत जास्त नियंत्रणात आणण्यासाठी उद्योगांना स्पष्ट व कडक निर्देश देत मंत्री मुंडे यांनी सांगितले की, चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी अल्प, मध्यम आणि दीर्घकालीन उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. कोळसा खाणी, कोल वॉशरीज आणि कोळशाच्या वाहतुकीमुळे होणारे प्रदूषण हे या परिसरातील प्रदूषणाचे प्रमुख स्रोत आहेत. विशेषतः कोळशाची वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे प्रदूषणात वाढ होत असल्याने भविष्यात रस्ते वाहतुकीऐवजी रेल्वे, कन्व्हेयर बेल्ट आणि झाकलेल्या कन्व्हेयर प्रणालीचा अधिक वापर करण्यावर भर देण्यात यावा. कोळसा खाणी व कोल वॉशरीज उद्योगांनी अल्पकालीन उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करावा. येत्या तीन महिन्यांत कोणत्या उपाययोजना केल्या जाणार आहेत, त्याची सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देशही मंत्री मुंडे यांनी यावेळी दिले.

# मालमत्तांच्या ‘सुप्त मूल्य’ उपयोगीतेचे सामर्थ्य ‘डेल्टा’ कायद्यात असावे - मुख्यमंत्री

■ मुंबई (दै. संध्या)

राज्याला २०३० पर्यंत ‘वन ट्रिलियन डॉलर’ अर्थव्यवस्था बनवण्याचे उद्दिष्ट साध्य करताना नवनवीन उत्पन्नाचे स्त्रोत विकसित करावे लागणार आहेत. त्या अनुषंगाने स्थावर मालमत्तांमध्ये असलेले सुप्त मूल्य लक्षात घेऊन या मूल्याचा सार्वजनिक हितार्थ उपयोग करण्यासाठी नवीन डेल्टा (महाराष्ट्र डिजिटायझेशन आणि एक्सचेंज ऑफ लँड टोकन असेट्स) कायदा प्रस्तावित करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. या कायद्यामध्ये मालमत्तांच्या ‘सुप्त मूल्य’ उपयोगीतेचे सामर्थ्य असावे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचित केले. सर्वसमावेशक आणि सर्व घटकांना अंतर्भूत करणाऱ्या अशा सर्वंकष कायद्याच्या निर्मितीसाठी सेबी, बीएससी, एनएससी आणि या क्षेत्रातील तज्ञ अनुभवी व्यक्तींचा समावेश असलेली समिती गठीत करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. डेल्टा कायदा मसुद्याचे सादरीकरण करण्यासाठी सह्याद्री अतिथी गृह येथे बैठक झाली. बैठकीस नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित होत्या. जगामध्ये यापुढे मालमत्तांचे टोकनायझेशन करून उत्पन्नाचे स्रोत निर्माण करीत जमिनीचे मूल्य वाढविले जाणार असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ब्लॉकचेन पद्धतीद्वारे स्थावर मालमत्तांना



टोकन देऊन त्यांचे मूल्यवर्धन केले जाणार आहे. यासाठी सध्या जगामध्ये अस्तित्वात असलेले कायदे, नियम आणि पद्धतींचा अभ्यास करण्यात यावा. देशामध्ये अशा पद्धतीचे कायदा प्रस्तावित करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. देशाला दिशादर्शक कायदे देण्याविषयी महाराष्ट्राचा नेहमी पुढाकार राहिला आहे. हा कायदाही महाराष्ट्राचे महत्व अधोरेखित करणारा ठरावा, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. ब्लॉकचेन पद्धतीद्वारे विकसित होणारी ही संपूर्ण व्यवस्था डिजिटल असणार आहे. या पद्धतीद्वारे जमिनीच्या मूल्यानुसार टोकन देऊन व्यवहार होतील. या संपूर्ण प्रक्रियेत अशा व्यवहारांना कायदेविषयक संरक्षण असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी महाराष्ट्राने पुढाकार घेत डेल्टा कायदा आणण्याचे प्रस्तावित केले आहे. हा कायदा बनवीत असताना त्यामध्ये कसलीही कमतरता राहू नये यासाठी या क्षेत्रातील असलेल्या संस्था नामवंत तज्ञ, अभ्यासक, स्टार्ट अप यांच्या अनुभवाचा उपयोग करावा.


# ‘माऊली’ संगीतमय नाट्यप्रयोगातून संत ज्ञानेश्वरांच्या जीवनचरित्राचा दिव्य आविष्कार

- सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे २१ जुलै रोजी दादर येथील श्री शिवाजी नाट्य मंदिरात आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम
- ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त भक्ती, अध्यात्म आणि संस्कृतीचा सुरेल संगम
- विशेष टपाल तिकिटाचे प्रकाशन

■ मुंबई (दै. संध्या)

सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त ‘माऊली’ या विशेष आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन मंगळवार, २१ जुलै २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता श्री शिवाजी नाट्य मंदिर, दादर, मुंबई येथे करण्यात आले आहे. संत ज्ञानेश्वरांच्या जीवनकार्यावर आधारित संगीतमय नाट्यप्रवास हा या कार्यक्रमाचा प्रमुख आकर्षण असणार असून, यावेळी विशेष टपाल तिकिटाचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या अलौकिक ज्ञान, अध्यात्म आणि भक्तीच्या माध्यमातून समाजाला समता, मानवता आणि विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. ‘ज्ञानेश्वरी’, ‘अमृतानुभव’ आणि ‘पसायदान’ या त्यांच्या अजरामर साहित्यकृती




आजही समाजाला दिशा देणाऱ्या ठरत आहेत. ‘दुरितांचे तिमिर जावो’ हा त्यांचा सार्वकालिक संदेश मानवकल्याणाची प्रेरणा देणारा आहे.

‘माऊली’ या संगीतमय नाट्यप्रयोगातून संत ज्ञानेश्वरांच्या जीवनातील विविध प्रेरणादायी प्रसंग, त्यांचे अध्यात्म, भक्तीमार्ग, समाजप्रबोधन आणि मानवतेचा संदेश संगीत, अभिनय, नृत्य आणि प्रभावी रंगमंचीय सादरीकरणाच्या माध्यमातून उलगडण्यात येणार आहे. या कार्यक्रमातून संत परंपरेचा वैभवशाली वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्यभर विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून ‘माऊली’ हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, अध्यात्माचा आणि सांस्कृतिक वैभवाचा परिचय रसिकांना या कार्यक्रमातून अनुभवता येणार आहे. संत ज्ञानेश्वरांच्या कार्याचा आणि त्यांच्या अमर संदेशाचा गौरव करणाऱ्या विशेष टपाल तिकिटाचे प्रकाशन हा या कार्यक्रमाचा विशेष आकर्षणबिंदू ठरणार आहे. हा उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध संतपरंपरेचे, सांस्कृतिक वारशाचे आणि आध्यात्मिक मूल्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. सदर कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून, संत ज्ञानेश्वरांच्या जीवनकार्याचा आणि त्यांच्या कालातीत संदेशाचा संगीतमय अनुभव घेण्याची ही एक आगळीवेगळी संधी आहे. कला रसिक, वारकरी, विद्यार्थी, संशोधक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

# राज्यात ‘बालस्नेही ग्रामपंचायत’ आणि ‘बालस्नेही प्रभाग’ उपक्रम राबविणार – आदिती तटकरे

**बालकांचे आरोग्य, शिक्षण, सुरक्षा आणि हक्कांवर विशेष भर**

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील प्रत्येक बालकापर्यंत आरोग्य, शिक्षण, पोषण आणि सामाजिक सुरक्षेच्या योजना प्रभावीपणे पोहोचाव्यात, तसेच बालकांमध्ये त्यांच्या हक्क व अधिकारांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने राज्यात ‘बालस्नेही ग्रामपंचायत’ आणि ‘बालस्नेही प्रभाग’ ही संकल्पना राबविण्यात येणार असल्याची घोषणा महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केली.

राज्य बाल हक्क आयोगामार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. मंत्रालयात झालेल्या बैठकीत बालकांच्या मानसिक आरोग्य, मूल्यसंस्कार आणि जीवनकौशल्य विकासासाठी तयार करण्यात आलेल्या ‘मानस’ पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच पालघर जिल्ह्यातील ५० शाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या ‘मानस’ प्रकल्पाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य कीटचे उद्घाटनही मंत्री तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. महिला व बालविकास मंत्री तटकरे म्हणाल्या की, ५ सप्टेंबर ते १४ नोव्हेंबर




या कालावधीत ग्रामीण व शहरी भागात विशेष अभियानाच्या स्वरूपात ‘बालस्नेही ग्रामपंचायत’ आणि ‘बालस्नेही प्रभाग’ ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याचा शासनाचा मानस आहे. या माध्यमातून बालकांना त्यांच्या हक्क, अधिकार आणि संरक्षणाच्या यंत्रणांची माहिती देत त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली जाणार आहे.

यामध्ये गंभीर कुपोषण निर्मूलन, बालविवाह प्रतिबंध, एकात्मिक बाल संरक्षण योजना, पोषण, शिक्षण आणि बालसुरक्षा या विषयांवर ग्रामपंचायतींच्या माध्यमातून प्रभावी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. अभ्यासामध्ये बाल सुरक्षा समित्यांची स्थापना, बालस्नेही पंधरवडा, बाल संसद, शिक्षण व आदिवासी विकास विभागाच्या शिफारसी, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (एनएफएचएस) आणि पोषण ट्रॅकर अहवालाचा तुलनात्मक अभ्यास, तसेच बालकांमधील कुपोषण, कमी वजन आणि वाढत्या अतिरिक्त वजनाच्या समस्यांचे विश्लेषण यांचा समावेश असावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. आदिवासी भागातील सुमारे ५०० शासकीय आणि ५०० खासगी आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या जवळपास पाच लाख विद्यार्थ्यांसाठी बालस्नेही ग्रामपंचायत राबविताना प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करावी. तसेच दुर्गम आणि आदिवासी भागातील बालकांच्या गरजा लक्षात घेऊन स्वतंत्र उपक्रम आखण्याचा विचार करावा, असे निर्देश त्यांनी दिले. शहरी भागात बालस्नेही प्रभाग राबविताना नगरविकास विभागाशी समन्वय साधून लोकसंख्येच्या तुलनेत अंगणवाड्यांची संख्या अपुरी असल्यास नवीन बालवाडी केंद्रे सुरू करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच बालपंचायतींच्या माध्यमातून शिक्षणाचा अधिकार (आरटीई), बालहक्क, ‘१०९८’ चाईल्ड हेल्पलाईन आणि विविध संरक्षण यंत्रणांची माहिती प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून बालकांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. बालस्नेही ग्रामपंचायतींमध्ये वर्षभरात नोंदविण्यात आलेल्या समस्या, त्यावरील उपाययोजना आणि झालेल्या सुधारणांचा नियमित आढावा घेऊन त्याचा सविस्तर अहवाल पुढील ग्रामसभेत सादर करण्यासाठी स्वतंत्र प्रणाली विकसित करण्याची सूचनाही त्यांनी केली.

राज्यात ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन विविध सकारात्मक उपाययोजना राबवित आहे. ‘बालस्नेही ग्रामपंचायत’ आणि ‘बालस्नेही प्रभाग’ हे उपक्रम बालकांच्या सुरक्षित, सुदृढ आणि सक्षम भविष्यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरतील, असा विश्वास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला. बैठकीस सचिव डॉ. अनुपकुमार यादव (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महिला व बालविकास आयुक्त वर्षा लड्ढा, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्त माधवी सरदेशमुख, उपसचिव आनंद भोंडवे, उपायुक्त वर्षा पवार, राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष संजय पुराणिक, सचिव वंदना जैन, मुंबई जिल्हा महिला व बालविकास अधिकारी शोभा शेलार, तसेच शिक्षण, ग्रामविकास विभाग, नगरविकास विभागाचे अधिकारी आणि युनिसेफचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### जुन्नरच्या बोरी गावात बिबट्या जेरबंद



नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील बोरी गावच्या जाधववाडी परिसरात बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या भीतीच्या पार्श्वभूमीवर वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात एक नर बिबट्या जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले आहे. सोपान जाधव यांच्या शेताजवळ हा पिंजरा लावण्यात आला होता. त्यामध्ये सोमवारी पहाटेच्या सुमारास बिबट्या अडकला. ही माहिती वनक्षेत्रपाल चैतन्य कांबळे यांनी दिली. वन विभागाच्या माहितीनुसार पकडलेला बिबट्या नर असून त्याचे वय अंदाजे आठ वर्ष आहे. बिबट्याची प्राथमिक वैद्यकीय तपासणी केल्यानंतर त्याला सुरक्षितपणे माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात हलविण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून जाधववाडी परिसरात बिबट्याचा वारंवार वावर दिसून येत होता. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक नागरिकांनी वन विभागाकडे वारंवार तक्रारी करून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी केली होती. जाधववाडी परिसर हा शेतीप्रधान असून ऊस, भाजीपाला आणि इतर पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या भागात बिबट्यांना आसरा मिळत असल्याचे मानले जाते. परिसरातील अनेक शेतकऱ्यांचे पाळीव कुत्रे बिबट्यांनी फस्त केल्याच्या घटना घडल्या आहेत. तसेच काही मेंढपाळांच्या मेंढरांवरही हल्ले झाल्याने आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी आणि पशुपालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार परिसरात अद्यापही नऊ ते दहा बिबटे वावरत असून एक बिबट्या पकडल्याने समस्या पूर्णपणे सुटलेली नाही. त्यामुळे पहाटे आणि सायंकाळच्या वेळेस शेतकऱ्यांना शेतात जाण्यास भीती वाटत आहे. दूध व्यवसाय करणारे गवळी, शाळकरी मुले तसेच महिलांना रस्त्यावरून ये- जा करताना बिबट्याच्या हल्ल्याची भीती सतावत आहे. अनेक ठिकाणी बिबटे मानवी वस्तीजवळ दिसून आल्याने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

### मतदार यादीत नाव कायम राहण्यासाठी (एसआयआर) मोहिमेत नोंदणी गरजेची

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : विशेष सखोल मतदार पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेला आता वेग आला असून, मतदारयादीत नाव कायम राहावे, यासाठी नागरिकांची धावपळ सुरु झाली आहे. सर्व गावामध्ये या मोहिमेला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. मात्र प्रत्येकाने मतदार यादीत नाव कायम राहण्यासाठी (एसआयआर) मोहिमेत बी.एल.ओ.शी संपर्क साधून आपले फॉर्म भरुन (एसआयआर) मोहिमेत नोंदणी करावी सद्य स्थितीत हयात असलेला कोणताही मतदार राजा मतदान करण्यापासून वंचित राहता कामा नयेत यासाठी त्याचे नाव मतदार यादीत कायम तसेच राहण्यासाठी ही (एसआयआर) मोहिम महत्वाची गरजेची असून यासाठी एसआयआर नोंदणी करण्याचे आवाहन माजी सरपंच सुरज चौधरी यांनी मतदारांना केले आहे. मतदानाच्या वेळी कोणतीही अडचण होऊ नये, यासाठी मतदार नावाची खात्री करुन माहिती अद्ययावत करण्यावर भर देत आहेत. निवडणूक आयोगाने ३० जूनपासून सुरु केलेली ही मोहीम २९ जुलैपर्यंत चालणार आहे. या काळात प्रत्येक मतदार याद्या काळात प्रत्येक मतदाराच्या माहितीची प्रत्यक्ष पडताळणी करुन नाव, पत्ता, जन्मतारीख, स्थलांतर, मृत मतदारांची नावे तसेच इतर तपशील अद्ययावत केले जात आहेत. त्यामुळे प्रत्येक मतदाराने या मोहिमेत सहभाग घेऊन आपली नोंदणी करून घ्यावीत असे आवाहन माजी चेअरमन लोकेश कानकाटे यांनी केले. मोहिमेसाठी आता अवघे काही दिवस शिल्लक असल्याने बी.एल.ओ.फार्म भरुन घेत नागरिकांनी बी.एल.ओ. सहकार्य करावे असे मतं संविधान फाउंडेशनचे अध्यक्ष विशाल शेलार यांनी मानले.

### एनबीसी बेअरिंग्जने नवीन ऑटोमोटिव्ह पार्ट्स श्रेणी लाँच करून केला विस्तार

पुणे (दैनिक संध्या) : नॅशनल इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज लिमिटेड. या भारतातील आघाडीच्या बेअरिंग उत्पादकाच्या आणि विश्वासार्ह मोबिलिटी सोल्यूशन्स भागीदाराच्या ब्रँड असलेल्या एनबीसी बेअरिंग्जने आज ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट उत्पादनांची एक विस्तृत नवीन श्रेणी लाँच करण्याची घोषणा केली, जी कंपनीच्या वाढ आणि विविधीकरण धोरणातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. बेअरिंग्ज आणि संबद्ध अभियांत्रिकी उत्पादने व सेवांमधील आपल्या मजबूत वारशावर आधारित, एनबीसी बेअरिंग्ज आता टू/थ्री व्हीलर आणि प्रवासी कारसाठी वायपर ब्लेड्स, ब्रेक पॅड्स, बेल्ट्स, स्टिअरिंग रॉड्स आणि इतर अनेक महत्त्वाच्या वाहन घटकांसह अनेक उच्च-संभाव्य ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट श्रेण्यांमध्ये प्रवेश करत आहे. ही धोरणात्मक विस्तार एनबीसी बेअरिंग्जच्या सर्वसमावेशक ऑटोमोटिव्ह उपाय प्रदान करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे, तसेच ती जलद वाढणाऱ्या भारतीय ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केटचा लाभ घेण्याचे काम करते. याप्रसंगी बोलताना अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहित साबू म्हणाले "वाढती वाहन मालकी, वाहनांच्या दीर्घायुष्य चक्र आणि दर्जेदार बदली भागांची वाढती मागणी यामुळे भारतीय ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट अभूतपूर्व वाढ अनुभवत आहे. दशकांच्या अभियांत्रिकी उत्कृष्टतेसह एक विश्वासार्ह ब्रँड म्हणून, एनबीसी बेअरिंग्जकडे या संधीचा लाभ घेण्यासाठी अनन्य स्थान आहे. आमच्या विस्तारित ऑटो पार्ट्स पोर्टफोलिओचे लॉन्च हे विविधीकरणाकडे एक धोरणात्मक पाऊल आहे

# पुरंदर विभागाची तिमाही आढावा बैठक संपन्न

सासवड (दै. संध्या)

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे यांच्या पुरंदर विभागातील एप्रिल 2026 ते जून 2026 या तिमाहीतील शाखा कामकाजाचा आढावा घेण्यासाठी विभागीय बैठक रविवारी (दि. 19 जुलै) सकाळी 10.30 वाजता सहकारमहर्षी शिक्षणप्रेमी चंद्रकाका जगताप सभागृह., सासवड येथे संपन्न झाली.






बैठकीस मा. आमदार तथा पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक श्री. संजयजी जगताप, प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजय शितोळे तसेच उप सरव्यवस्थापक व तालुका संपर्क अधिकारी श्री. गिरीश जाधव सुनील माळी,विभागीय अधिकारी महेश खैरे, पुरंदर नागरी सहकारी पतसंस्थेचे सरव्यवस्थापक अनिल उरवणे विकास अधिकारी व सासवड नगरपालिकेचे आरोग्य सभापती राजन जगताप, जयेश गद्रे,पवन दुर्गाडे,शरद वनवे, मयूर भुजबळ, अण्णा शिंदे, शिरीष जाधव, शाखा अधिकारी अंकुश हिंगणे, सुधीर धुमाळ, हरीश जगताप, संतोष जगताप, संतोष दुर्गाडे, सुधीर शेलार, नीता मानकर, दुर्गडे मॅडम,यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत पुरंदर विभागातील सर्व शाखांच्या कर्ज वितरण, कर्जवसुली, ठेवी, एनपीए (NPA), व्यवसायवाढ तसेच इतर बँकिंग कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. निर्धारित उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्यासाठी शाखा व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत सुरू करण्यात येणाऱ्या LTSB Bond व PDI Bond या विशेष गुंतवणूक योजनांची माहिती देण्यात आली. 8.50 टक्के आकर्षक व्याजदरासह उपलब्ध असलेल्या या योजनांमध्ये ग्राहकांनी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले. या बाँड योजनेचा कालावधी दि. 22 जुलै 2026 ते दि. 06 ऑगस्ट 2026 असा राहणार असल्याची माहिती देण्यात आली.

बैठकीस पुरंदर विभागातील सर्व शाखांचे व्यवस्थापक, अधिकारी व सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विभागाच्या प्रगतीसाठी समन्वयाने कार्य करून आगामी तिमाहीत व्यवसायवाढीचे उद्दिष्ट साध्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## रुग्णांच्या उत्तम आरोग्यासाठी डॉक्टरांची पावले

■ सकारात्मक परिणाम दिसून आले : डॉ. सोनाली भोजने

पुणे (दै. संध्या)

एक निरोगी भारत घडवण्यात डॉक्टरांनी नेहमीच अतुलनीय भूमिका बजावली आहे. सार्वजनिक आरोग्य, जनहित आणि जनजागृतीसाठी डॉक्टरांनी केलेल्या समर्पित प्रयत्नांची व महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेत, वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर आणि आरोग्य तज्ज्ञांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

आजच्या काळात आरोग्यसेवा ही केवळ औषधोपचारांपुरती मर्यादित राहिलेली नाही; संतुलित जीवनशैली, नियमित व्यायाम आणि योग हे उत्तम आरोग्याचे महत्त्वाचे आधारस्तंभ बनले आहेत. योगामुळे केवळ शारीरिक आरोग्यच सुधारत नाही, तर मानसिक संतुलन, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोनही वृद्धिंगत होतो. म्हणूनच, वैद्यकीय तज्ज्ञ लोकांना योग आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब करण्यास वारंवार प्रोत्साहित करतात. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देशभरात आरोग्य आणि योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करून विविध आरोग्य समस्या टाळता येतात आणि वाढत्या वयातही निरोगी, सक्रिय व उत्साही जीवन जगता येते, यावर तज्ज्ञांनी भर दिला. हा उद्देश साध्य करण्यासाठी एका विशेष योग जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी एका अनुभवी योग तज्ज्ञांना आमंत्रित करण्यात आले होते; त्यांनी उपस्थित रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांना विविध योगासने, प्राणायाम आणि आरोग्यदायी जीवनशैलीचे महत्त्व यांबाबत सविस्तर माहिती दिली.

## एएमएस प्रशालेत एकदिवशीय कार्यशाळा संपन्न




चाकण (दै. संध्या)

चाकण येथील एएमएस इंग्लिश मीडियम प्रशालेत खेड तालुक्यातील माध्यमिक शाळेतील विज्ञान व गणित शिक्षकांसाठी एक दिवशीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. एकदिवशीय कार्यशाळेत तालुक्यातील ७० शाळेतील शिक्षकांनी सहभाग घेतला होता. प्रशालेच्या प्राचार्या समृद्धी शिवने यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उदघाटन करण्यात आले. संस्थेच्या संचालिका सायली शिवने यांनी सर्वांचे स्वागत केले. ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम, संशोधन विभाग यांच्यामार्फत प्रकल्प प्रमुख पूर्वा धोकटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा मोठ्या दिमाखात संपन्न झाली. भौतिक शास्त्र विषयातील घटक कृतीयुक्त पद्धतीने शिकवले जात असल्याचे प्राचार्या समृद्धी शिवणे यांनी सांगितले. रूपाली गोगावले यांनी कार्यशाळेचे संयोजन केले होते. विलास आदलिंगे यांनी सूत्रसंचालन केले.

## अखिल भारतीय मराठा महासंघाच्या राष्ट्रीय व प्रदेश कार्यकारिणीच्या नियुक्त्या जाहीर

सासवड (दै. संध्या)

अखिल भारतीय मराठा महासंघाच्या मुंबई येथील 'शिवनेरी' मुख्यालयात नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत महासंघाच्या राष्ट्रीय, प्रदेश आणि जिल्हास्तरीय महत्त्वाच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. दिलीपसिंह जगताप आणि राष्ट्रीय चिटणीस श्री. दशरथ पिसाळ यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले.



पुणे शहराचे माजी अध्यक्ष असलेल्या प्रा. डॉ. शिळीमकर यांच्याकडे आता राष्ट्रीय स्तरावर संघटनात्मक विस्तार, युवकांचे संघटन आणि विविध सामाजिक उपक्रमांच्या समन्वयाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली आहे.त्यांची संघटन सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कै. ॲड. शशिकांत (अप्पा) पवार यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

शिक्षणमहर्षी कै. उत्तमराव (अण्णा) पाटील यांचा सामाजिक व शैक्षणिक वारसा समर्थपणे चालवणारे आणि ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीचे कोषाध्यक्ष असलेल्या अजय उत्तमराव पाटील यांची प्रदेश उपाध्यक्षपदी पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. धरणग्रस्तांच्या प्रश्नांसाठी लढा देणारे आणि विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून कार्यरत असलेले, महासंघाचे माजी शहराध्यक्ष संजयदादा पासलकर यांची पुणे जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ते कै. दत्तात्रय पासलकर यांच्या सामाजिक विचारांचा वारसा पुढे नेत आहेत.

यावेळी महासंघाचे श्री. अंकुश कोकाटे, श्री. अविनाश पासलकर, श्री. भूषण शिंदे, श्री. राजेश खोपडे, श्री. सचिनकाका शिळीमकर व श्री. नितीनबापू पासलकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी बोलताना नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी, मराठा समाजाचे संघटन अधिक सक्षम करणे, युवकांना मुख्य प्रवाहात जोडणे आणि समाजाच्या ज्वलंत प्रश्नांवर प्रभावीपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## वाडेबोल्हाईत विठ्ठल नामाची शाळा भरली

■ विद्यार्थ्यांमध्ये पावसात भक्तीचा उत्साह जोगेश्वरी माता विद्यालयाच्या हजारों विद्यार्थ्यांचा पालखी सोहळा

पुणे (दै. संध्या)




कोरेगावमुळ,(दै.संध्या):- रिमझिम पावसात चाललेला विठ्ठलनामाचा गजर, टाळ-मृदंगांचा नाद आणि वारकऱ्यांच्या वेशातील वाडेबोल्हाई येथील जोगेश्वरी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी वारकरी यांचा भक्तीमय वातावरणात विद्यार्थ्यांच्या वारीचा पालखी सोहळा रंगला. या विद्यालयातील हजारांहून अधिक विद्यार्थी वारकरी म्हणून या वारीत सहभागी झाले होते. आषाढी एकादशीच्या पर्वानिमित्त या अनोख्या पालखीचे आयोजन संत तुकाराम शिक्षण संस्था संचालित जोगेश्वरी माता विद्यालयाच्या वतीने विद्यालयातून - बोल्हाई गावाला वळसा घालून ते ३ किलो मिटर अंतरावर असलेल्या वाडेफाटा येथे वाघोली - राहू रस्त्यालगत विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात करण्यात आले होते. सकाळपासून रिमझिम पाऊस सुरू असताना देखील विद्यार्थी विठ्ठल-रुक्मिणी, टाळकरी व वारकऱ्यांच्या आकर्षक वेशभूषेत आणि संपूर्ण उत्साहात या पालखीत सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांच्या पालखीची सुरुवात जोगेश्वरी माता विद्यालयातून झाली तर वाडेफाटा येथील विठ्ठल - रुक्मिणी मंदिरात सांगता झाली. टाळ-मृदंगाच्या गजरात,लेझीम,फुगड्या, रिंगण आणि अखंड हरिनामाच्या जयघोषात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेचा आविष्कार घडविला. महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायातील संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या विचारांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी तसेच मराठी संस्कृती,परंपरा आणि आध्यात्मिक मूल्यांचे संस्कार नव्या पिढीत रुजावेत, या उद्देशाने हे आयोजन करण्यात आले होते. अशी माहिती या विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा.सतिश धुमाळ यांनी दिली. तर या सोहळ्याचे स्वागत वाडेबोल्हाईचे माजी आदर्श सरपंच कुशाभाऊ गावडे यांनी केले. याप्रसंगी जोगेश्वरी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक प्रा.गणेश फलके, राजेंद्र कोल्हे, राजेंद्र गायकवाड, राजेंद्र राऊत, दर्शन चौधरी, किरण गायकवाड, पांडुरंग लांडे, अमर गायकवाड, स्वप्नील वाघमारे, सविता इंगळे, पल्लवी गायकवाड, रुपाली नवले, रेखा पठारे, ज्ञानेश्वर मेंगडे, कोमल गायकवाड, शोभा कुदळ, ओमेश्वरी भारसाकळे, हरगुडे, भोर मॅडम, कोतवाल, राजेंद्र ढगे, विशाल्या रंधवे, दिपक भंडलकर, आदी उपस्थित होते.

## बंडगार्डन पोलिस ठाण्यातून आरोपी बेड्यांमधून हात काढून पसार

पुणे (दै. संध्या)

बंडगार्डन पोलिस ठाण्यातील तपास पथकाच्या खोलीतून आरोपी पसार झाल्याची घटना घडली. वैभव अनिल खोत (वय १९, रा. श्रमिकनगर, टिंगरेनगर) असे पळून गेलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलिस अंमलदार शहाजी ठवाळ यांनी बंडगार्डन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी वैभव खोत याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. खोत याला एका गुन्ह्यात अटक करून पोलिस ठाण्यातील तपास पथकाच्या खोलीत बेडी लावून ठेवले होते. मात्र, रविवारी (ता. १९) पहाटे चारच्या सुमारास त्याने स्वतःचा हात बेडीतून अलगद



बाहेर काढत मुख्य प्रवेशद्वारातून पळ काढला. या घटनेमुळे पोलिस दलात खळबळ उडाली आहे. हा प्रकार घडल्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. पुणे स्टेशन परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिस उपनिरीक्षक गणेश चव्हाण आरोपीचा शोध घेत आहेत.

# दीर्घकालीन निरामय आरोग्यासाठी आयुर्वेद महत्त्वपूर्ण

**आयुर्वेदासह भारतीय ज्ञान परंपरेचे जतन आवश्यक : शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांचे प्रतिपादन**

पुणे (दै. संध्या)

"आयुर्वेद हा भारताचा प्राचीन आणि समृद्ध ज्ञानवारसा असून, आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत दीर्घकालीन निरामय आरोग्य राखण्यासाठी त्याचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. आधुनिक वैद्यकासोबत आयुर्वेद आणि निसर्गोपचार यांचा समन्वय साधल्यास अनेक जीवनशैलीजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येऊ शकते. मात्र, आयुर्वेदाच्या शास्त्रीय तत्त्वांची आणि त्याच्या उपयुक्ततेची पुरेशी माहिती अजूनही समाजापर्यंत पोहोचलेली नाही. त्यामुळे आयुर्वेदाबाबत जनजागृती होणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी केले.




वैद्य डॉ. हरीश पाटणकर यांच्या ज्ञानसंकुल विद्यार्थी संघाच्या प्राचीन संहिता गुरुकुलातर्फे आयोजित 'दिग्गजांच्या मुलाखती' या कार्यक्रमात ते बोलत होते. टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कुलच्या गणेश सभागृहात आयोजित कार्यक्रमावेळी ज्येष्ठ वैद्य प्रवीण जोशी, संयोजक वैद्य डॉ. हरीश पाटणकर, डॉ. स्नेहल पाटणकर, गुरुकुलाचे विश्वस्त सुरेश मोहिते, नीता मोहिते आदी उपस्थित होते.

यावेळी वैद्य संतोष सूर्यवंशी यांना 'कै. नानासाहेब पाटणकर स्मृती आयुर्वेद कृषीरत्न पुरस्कार', तसेच वैद्य प्रवीण जोशी यांना 'आचार्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला. वैद्य हरीश पाटणकर लिखित 'ईसीजी ऑफ स्कीन' या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. गुरुकुलाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. गुरुकुलाच्या केशायुर्वेद उपक्रमाच्या दशकपूर्तीनिमित्त केशायुर्वेद रत्न पुरस्कारही प्रदान करण्यात आले.

सचिंद्र प्रताप सिंह म्हणाले, "शिक्षण क्षेत्रात अपवादाने घडणाऱ्या दुर्दैवी घटकांना पायबंद घालण्यासाठी यंत्रणा प्रयत्नशील आहे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार 'एनसीईआरटी'कडून अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल केले जात आहेत. नव्या अभ्यासक्रमात कौशल्य प्रशिक्षण आणि व्यवसायाभिमुख शिक्षणावर भर आहे. मातृभाषेतून शिक्षण, मराठी शाळांचे संवर्धन आणि भारतीय ज्ञान परंपरेवर आधारित 'इंडियन नॉलेज सिस्टीम' (IKS) यांचा शिक्षण व्यवस्थेत प्रभावी समावेश करणे ही काळाची गरज आहे. आपल्या सांस्कृतिक आणि वैचारिक परंपरेशी विद्यार्थ्यांना जोडण्यासाठी या संकल्पना अत्यंत महत्त्वाच्या आहेत."

वैद्य जोशी यांनी बालपणापासूनच्या तसेच वैद्य म्हणून झालेल्या जडणघडणीचे किस्से सांगितले. जुन्या पिढीत निदान आणि चिकित्सा पद्धती दर्जेदार होत्या. त्यामुळे गुरुसेवा आणि शास्त्रसेवेचे व्रत अंगिकारण्याची गरज आहे. सध्या शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात अंतर निर्माण झाले आहे, ते भरून काढण्याची आवश्यकता आहे. शास्त्रीय पंचकर्माची जागा घेणार्या वेलनेस सेंटर्सचा धोका ओळखण्याचा सल्लाही त्यांनी दिला. वैद्य संतोष सूर्यवंशी यांनी हा भावनिक क्षण असून, स्वयंपूर्ण खेड्याच्या संकल्पनेनुसार स्वग्राम उपक्रमाची आखणी, तंत्रज्ञानाची जोड देत वनौषधी तसेच गोशाळा विकसित करण्यात येत आहेत. डॉ. नीता मोहिते यांनी गुरुकुलाच्या भारतीय ज्ञान परंपरा आधारीत उपक्रमाविषयी माहिती दिली. स्वागतपर प्रास्ताविकात वैद्य पाटणकर यांनी प्राचीन संहिता गुरुकुलाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच पुरस्कारामागील भूमिका स्पष्ट केली. वैद्य विवेक आंबरे आणि वैद्य अचला यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. स्नेहल पाटणकर यांनी आभार मानले.

## १५ वर्षांपासून प्रलंबित दिवाणी खटल्यात

# जुन्नरच्या तहसीलदारांविरुद्ध ₹१०,००० चे जामीनपात्र वॉरंट

नारायणगाव (दै. संध्या)

न्यायालयीन समन्सकडे दुर्लक्ष करणाऱ्या सार्वजनिक अधिकाऱ्यांविरुद्ध न्यायालयाने कठोर भूमिका घेत जुन्नरचे तहसीलदार यांच्याविरुद्ध ₹१०,००० चे जामीनपात्र वॉरंट जारी करण्याचा महत्त्वपूर्ण आदेश दिला आहे. हा आदेश संयुक्त दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, जुन्नर श्री. अनंत हिम्मतराव बाजड यांनी नियमित दिवाणी दावा क्र. १३९/२०१० पिराजी भाऊ फुलसुंदर विरुद्ध मस्जिद कब्रस्तान उर्फ इब्राहिम तांबोळी या तब्बल १५ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या दिवाणी दाव्यात पारित केला आहे.




सदर दाव्याच्या अंतिम निकालासाठी तहसीलदार यांची साक्ष अत्यंत आवश्यक असल्याने न्यायालयाने त्यांना यापूर्वी विधिवत साक्षीदार समन्स बजावले होते. न्यायालयाच्या नोंदीनुसार, समन्सची योग्य प्रकारे सेवा झाल्यानंतर सुरुवातीला तहसीलदारांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीचे कारण देत एकदा मुदतवाढ मागितली होती. त्यानुसार न्यायालयाने त्यांना दुसरी संधी दिली. मात्र त्यानंतर निश्चित करण्यात आलेल्या पुढील तारखेलाही ते न्यायालयात हजर राहिले नाहीत. इतकेच नव्हे तर अनुपस्थितीबाबत कोणतेही अधिकृत पत्र, कारण किंवा स्पष्टीकरणही न्यायालयास सादर करण्यात आले नाही.

न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केले आहे की, सदर दावा गेली १५ वर्षे प्रलंबित असून केवळ आवश्यक साक्षीदाराच्या अनुपस्थितीमुळे त्याच्या अंतिम सुनावणीस विलंब होत आहे. न्यायालयाचा मौल्यवान वेळ वाया जात असून न्यायदान प्रक्रियेवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचेही न्यायालयाने स्पष्टपणे नोंदविले आहे. न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश १६ नियम १०(३) चा संदर्भ देत स्पष्ट केले की, न्यायालयाने विधिपूर्वक समन्स बजावलेल्या प्रत्येक साक्षीदारावर न्यायालयात उपस्थित राहण्याची कायदेशीर जबाबदारी असते. समन्सचे पालन न करणाऱ्या साक्षीदाराविरुद्ध न्यायालयाला अटक वॉरंट जारी करण्याचा अधिकार कायद्याने प्रदान करण्यात आला आहे.

तहसीलदार हे सार्वजनिक सेवक असल्यामुळे न्यायालयाने संयमाची भूमिका घेत थेट अजामीनपात्र वॉरंट जारी करण्याऐवजी प्रथम ₹१०,००० चे जामीनपात्र वॉरंट काढण्याचा निर्णय घेतला. सदर वॉरंटची अंमलबजावणी जुन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी करावी तसेच तहसीलदारांना दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी न्यायालयात उपस्थित राहून साक्ष देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.